रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक ३५८
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १६ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

ना. गडकरी धमकीप्रकरणी सूत्रधार पोलिसांच्या ताब्यात/२
रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
अश्विनच्या फिरकीने विंडीज संघ गारद/८

## अबुधाबीमध्ये आयआयटी दिल्लीचे कॅम्पस होणार स्थापन



**अबुधाबी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे फ्रान्सचा दौरा झाल्यानंतर शनिवारी (दि. १५) संयुक्त अरब अमिरातच्या (यूएई) दौऱ्यावर होते. या वेळी त्यांनी युएईचे राष्ट्रपती शेख बिन जायद यांची भेट घेतली आणि त्यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक केली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि अबुधाबीच्या शिक्षण मंत्रालयाने तेथे आयआयटी दिल्लीचे कॅम्पस स्थापन करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) दिल्ली ही आयआयटी मद्रासनंतर बाहेरील देशात आयआयटीचा कॅम्पस स्थापन करणारी दुसरी संस्था आहे.

# पंतप्रधान मोदींचा जगभरात करिष्मा

## उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून स्तुतीसुमने

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्याच्या अर्थमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार शनिवारी (दि. १५) नाशिक दौऱ्यावर होते. तेथे पत्रकार परिषदेत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले. देशातच नव्हे; तर जगभरात पंतप्रधान मोदींचा करिष्मा असून त्यांच्यासारखे दुसरे नेतृत्व नसल्याचे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले, मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या साक्षीने नाशिककरांना आणि माझ्या महाराष्ट्रातील जनतेला सांगू इच्छितो की, कसल्याही प्रकारचे नैसर्गिक संकट आले, तरी महाराष्ट्र सरकार तुमच्या पाठिशी उभे राहील. तुम्ही अजिबात एकटे वाटून घेऊ नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपात देशाला अतिशय कणखर नेतृत्व मिळाले



आहे. उद्या काही मदत लागली, तर आम्ही लोक पंतप्रधान मोदींना भेटून तशी मदत निश्चितपणे मिळवू शकतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा झपाट्याने विकास होत आहे. जगभरात भारताची पत आणि प्रतिष्ठा वाढत आहे. भविष्यात एक महासत्ता म्हणून देशाची आगेकूच सुरू आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून देशात सर्वत्र विकासाच्या योजना राबवल्या जात आहेत. केंद्राच्या मदतीने आपल्या राज्याच्या विकासाला आणखी गती देण्याचा प्रयत्न महायुतीचा आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

देशाने कालच चांद्रयान-३चे प्रक्षेपण केले. ही चांद्रयान मोहीम भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची एक गरूडभरारी आहे. उद्याच्या काळात एक महासत्ता म्हणून भारताची आगेकूच चालली आहे. कुठल्याही क्षेत्रात भारत पाठीमागे राहणार नाही याची खबरदारी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतली आहे. आज संपूर्ण जगाने या गोष्टीची नोंद घेतली आहे, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

### नाशिकमध्ये शासन आपल्या दारी अभियान

**नाशिक** : डोंगरे वसतिगृह मैदान येथे शासन आपल्या दारी या अभियानाचा नाशिक जिल्हास्तरीय कार्यक्रम झाला. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री छगन भुजबळ, गिरीष महाजन, उदय सामंत, पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार, आमदार, अधिकारी, लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





(छाया : विजय मांडे)

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कर्जतमध्ये भाजप वॉर रूमचे उद्घाटन

### विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने आगामी निवडणुकांच्या दृष्टीने वॉर रूम साकारण्यात आली असून मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १५) उद्घाटन करण्यात आले. कार्यकर्ते तसेच नागरिकांना संपर्क करण्यासाठी हे ठिकाण सोयीचे ठरणार आहे. या वेळी विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यावर विश्वास ठेवून आज काही कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. त्यांचे मी स्वागत करतो. महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजप वाढणार आहे. आपले उमेदवार असतील त्यांच्यासाठी आपण काम करणारच आहोत, शिवाय आपल्याबरोबर असतील त्यांनाही या पक्षवाढीचा फायदा निश्चित होईल.*

*–**आमदार प्रशांत ठाकूर,** निवडणूक प्रमुख, मावळ लोकसभा मतदारसंघ*

कर्जतमधील मुद्रे बुद्रुक येथील नेमिनाथ इमारतीत भाजपची वॉर रूम साकारण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आल्यानंतर त्यांच्याच हस्ते संगणक सुरू करून प्रत्यक्ष काम करण्याची सुरुवात केली गेली.


या वेळी भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजप विधानसभा संपर्क प्रमुख किरण ठाकरे, तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, शहराध्यक्ष तथा नगरसेवक बळवंत घुमरे, संजय कराळे, माजी नगरसेविका बिनीता घुमरे, ॲड. हृषिकेश जोशी, सरस्वती चौधरी आदी उपस्थित होते.

प्रारंभी मंगेश म्हसकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर कशेळे येथील शेकाप कार्यकर्ते आत्माराम खंडागळे, गजानन भोईर, नंदा भोईर, भगवान हरपुडे, रजनी भोईर, सुनीता खंडागळे, संगीता हरपुडे, समीर खंडागळे, राहुल दुतसागर, वैभव भोईर, अभय भोईर, गोपाळ भोईर, मंगेश भोईर, संगम खंडागळे, किसन खंडागळे, सुरेखा खंडागळे, जनार्दन खंडागळे, नंदा खंडागळे आणि देविदास बाळाराम म्हसे, अरबाज नासिर शेख आदी निकोप मोहीली येथील शिवसेना कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत केले.

## खालापुरात पर्यटकाकडून हवेत गोळीबार

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील बोरगाव सोंडेवाडी येथे वर्षापर्यटनासाठी आलेल्या एका पर्यटकाने त्याच्याकडील पिस्तुलातून हवेत गोळीबार केल्याचा प्रकार शुक्रवारी (दि. १४) सायंकाळी घडला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. या प्रकरणी त्या पर्यटकावर खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पिस्तूल जप्त करण्यात आले आहे.



बदलापूर येथे राहणारा अमित गुरुनाथ मोरे मित्रांसह सोंडेवाडी धबधब्यावर आला होता. अमितसोबत चौक वावर्ले गावातील त्याचा नातेवाईकही होता. अमित याने स्वतःजवळील परवानाधारक पिस्तूलमधून अचानक हवेत गोळीबार केला. त्यामुळे घाबरलेल्या पर्यटकांनी पळ काढण्यास सुरुवात केली. पर्यटकांपैकी धनराज बडे (रा. अजिवली, पनवेल) यांनी अमितला याबाबत जाब विचारला असता अमित व त्याच्या साथीदाराने धनराजला जबर मारहाण केली.

अमित राणेविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्याजवळील पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. त्याला नोटीस देऊन सोडण्यात आले. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## मुंबईत आयआयएम सुरू करण्यास मंजुरी



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत आयआयएम म्हणजेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सुरू करण्यात येणार आहे. दिल्लीत झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. हे विधेयक केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झाल्यानंतर आता संसदेच्या पावसाळी अधिवेशनात या विधेयकाला मंजुरी देण्यात येईल.

मुंबईच्या पवईतील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग म्हणजेच नीटी या संस्थेलाच आयआयएम म्हणून मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आता मुंबईतील आयआयएममध्ये एमबीएच्या जवळपास साडेतीनशे जागांसाठी प्रवेश दिला जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे तसेच आता देशातील २१ आणि महाराष्ट्रातील दुसरी आयआयएम शिक्षण संस्था म्हणून मुंबईच्या आयआयएमकडे पाहिले जाणार आहे.

## निवडक

### ज्येष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांचे निधन



**तळेगाव** : मराठी सिनेसृष्टीतील विनोद खन्ना अशी ओळख असलेले ज्येष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी (वय ७४) यांचे निधन झाले आहे. तळेगाव दाभाडेजवळ आंबी येथील त्यांच्या भाड्याच्या घरी ते मृतावस्थेत आढळले. फ्लॅटमधून दुर्गंधी आल्याने शेजाऱ्यांनी पोलिसांना कळवले. त्यानंतर त्यांच्या मृत्यूची माहिती समोर आली.

### 'मॉन्सून मिशन'साठी भारत घेणार जगभरातून मदत

**पुणे** : केंद्रीय पृथ्वी विज्ञानमंत्री किरण रिजीजू यांनी शनिवारी (दि. १५) पाषाण रस्ता येथील हवामानशास्त्र संस्थेला भेट दिली. मान्सून मिशनसाठी जगभरातून मदत घेणार असल्याचे ते म्हणाले.

### रायगडचे पर्जन्यमान

**२४ तासांतील पाऊस : ३८.१ मिमी**
**एकूण पाऊस : ९११.१४ मिमी**

## बाळासाहेबांच्या नावाला तुम्ही कलंक लावला!

### मुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल




**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जसा पोपटाचा जीव पिंजऱ्यात असतो तसा आमच्या नेतृत्वाचा जीव मुंबई महापालिकेत होता. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी कोणताही विचार न करता माझ्या माझ्या एका शब्दावर मुंबई महापालिका बिनविरोध करीत महापौरपद शिवसेनेला दिले. खरा युती धर्म पाळणारे देवेंद्र फडणवीस हा निष्कलंक माणूस आहे, मात्र २०१९मध्ये कलंकितपणा तुम्ही केला. बाळासाहेबांच्या नावाला कलंक तुम्ही लावला, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. ते शुक्रवारी कोल्हापुरात शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मेळाव्यात बोलत होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी, उद्धव ठाकरेंवर टीका करताना युती टिकावी यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी दरवेळी दोन पावले मागे घेतली, पण तुम्ही काय केले? २०१९ सालीदेखील युती टिकावी यासाठी प्रयत्न सुरू होते. देवेंद्र फडणवीस यांनी ४० ते ५० वेळा फोन केला, मात्र जसे निकाल हाती आले आणि आपल्याविना सरकार स्थापन होणार नाही असे आमच्या नेत्यांना वाटले तेव्हा वेगवेगळी स्टेटमेंट येऊ लागली. फडणवीस यांचे फोनही त्यांनी घेतले नाहीत, असे सांगितले.

बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देत विरोधकांसोबत जाऊन सत्ता स्थापन केली, असे म्हणत जेव्हा जेव्हा अन्याय होतो तेव्हा एकनाथ शिंदे जन्म घेतो, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## पेणमधील जिते येथे विद्युत उपकेंद्राची उभारणी

### नागरिक, गणेशमूर्ती कारखान्यांना होणार सुरळीत वीजपुरवठा

**पेण : प्रतिनिधी**

पेणचे आमदार रविशेठ पाटील व भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने खरोशी विभागातील गावांना भेडसावणाऱ्या विजेच्या समस्येवर जिते येथे २५ हजार के.वी. क्षमतेच्या विद्युत उपकेंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या उपकेंद्राचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते शनिवारी (दि. १५) झाले.

या कार्यक्रमास भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, डी.बी. पाटील, महावितरणचे अभियंते उमाकांत सकपाळे, विश्वास थोरात, हमरापूर विभाग गणेश मूर्तिकार संघाचे अध्यक्ष अभय म्हात्रे, कळवे सरपंच बाळा पाटील, सचिन पाटील, शंकर मोकल, दुरशेत सरपंच दशरथ गावंड, खरोशीचे महेश पाटील, जिते सरपंच लीलाधर म्हात्रे, मयूर सुर्वे, पायल सुर्वे, सुप्रिया पाटील, सूर्यहास पाटील आदी उपस्थित होते.

**आमदार रविशेठ पाटील व वैकुंठ पाटील यांचे प्रयत्न सार्थकी**



(छाया : अनिस मनियार)

पेण तालुक्यातील खरोशी, तरणखोप, जिते, दादर, दुरशेत, हमरापूर, खारपाडा या गावांना स्वतंत्र फिडर नसल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येने ग्रामस्थ त्रस्त होते. त्यांनी अनेकदा विद्युत मंडळाकडे पत्रव्यवहार केला तसेच आंदोलने करूनही समस्या कायम होती. या समस्येचा तिढा अखेर आमदार रविशेठ पाटील व जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या विशेष प्रयत्नांनी सुटला असून खरोशी येथे विद्युत उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले. याबद्दल नागरिकांनी आभार मानले.

ग्रामीण भागासह गणेशमूर्ती कारखान्यांना नियमित वीजपुरवठा होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने नियोजन करा, अशा सूचना या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी महावितरणच्या अभियंत्यांना केल्या.


भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील म्हणाले की, वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने गणेशमूर्ती व्यावसायिकांच्या सुविधेसाठी आमदार रविशेठ यांच्या प्रयत्नाने हमरापूर विभागाकरिता स्वतंत्र फिडर देण्यात आला आहे तसेच इतरही ठिकाणी स्वतंत्र फिडर असल्याने वीजपुरवठा सुरळीत प्रकारे होणार आहे. यासाठी केलेल्या प्रस्तावाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून तत्काळ मंजुरी देण्यात मिळाल्याने चांगले काम होत आहे.

## टोमॅटो विकून शेतकरी बनला करोडपती

**जुन्नर : प्रतिनिधी**

सध्या टोमॅटोचे दर कमालीचे वधारले असून सामान्य ग्राहक हवालदिल झाला आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात एका शेतकऱ्याने टोमॅटोच्या विक्रीतून कोट्यवधींचा नफा कमावल्याचे समोर आले आहे. यामुळे टोमॅटोच्या दरांमुळे सामान्यांना आर्थिक भार सोसावा लागत असला, तरी बळीराजाला मोठा आर्थिक दिलासा मिळत असल्याचीही भावना व्यक्त होत आहे.

दोनच दिवसांपूर्वी कर्नाटकच्या एका शेतकऱ्याला एका दिवसात ३८ लाखांचा नफा झाल्याचे वृत्त समोर आले होतं. त्यापाठोपाठ महाराष्ट्राच्या जुन्नर भागातील एका



शेतकऱ्याने गेल्या महिनाभरात फक्त टोमॅटोच्या विक्रीतून सुमारे दीड कोटींचा नफा कमावला आहे. जुन्नरमधील तुकाराम भागोजी गायकर या शेतकऱ्याने त्यांच्या १८ एकर जमिनीपैकी १२ एकरवर टोमॅटोची लागवड केली होती. गेल्या महिन्याभरात गायकर यांनी तब्बल १३ हजार टोमॅटो क्रेटची (२० किलो प्रतीक्रेट) विक्री केली असून त्यातून त्यांना दीड कोटींहून अधिक उत्पन्न मिळाले आहे.

गेल्या महिन्याभराचा हिशोब लावला असता गायकर यांनी नारायणगंजमधील बाजार समितीमध्ये केलेल्या विक्रीतून त्यांना भरघोस नफा मिळाला. गेल्या महिन्यात गायकर यांनी १००० ते २४०० रुपये प्रतीक्रेट दराने टोमॅटोची विक्री केली. गायकर यांच्याप्रमाणेच जुन्नरमधील इतर टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांनीही अशाच प्रकारे उत्पन्न मिळवले आहे.

नारायणगंज बाजारपेठेत टोमॅटोच्या एका क्रेटसाठी सर्वाधिक किंमत २५०० रुपये इतकी आली आहे. त्यामुळे टोमॅटोचे उत्पन्न घेतलेल्या शेतकऱ्यांना चांगले दिवस आल्याचे बोलले जात आहे.

## अभिवादन!



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते स्व. लक्ष्मणशेठ पाटील यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नावडे येथे जाऊन अभिवादन केले. या वेळी बंधू विष्णू म्हात्रे, पुत्र सचिन पाटील तसेच राम पाटील, दत्ता वर्तेकर, शैलेश डोंगरे, रोशन पाटील आदी उपस्थित होते.**

## राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे सर्वच जिल्ह्यांत पावसाची रिपरिप बघायला मिळणार आहे.



संपूर्ण राज्यात पुढील पाच दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात पुढील पाच दिवसासाठी यलो अलर्ट आहे. मराठवाड्यातदेखील पुढील दोन दिवस काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. १७ जुलैपासून पुन्हा तळकोकणात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून उत्तर महाराष्ट्रात विजांसह पावसाचा अंदाज आहे.

राज्यात पाऊस पडत असला तरी त्यात जोर नसल्याने आतापर्यंत अनेक ठिकाणी पावसाची तूट असल्याचे चित्र आहे. पेरण्यांना ठिकठिकाणी सुरुवात झाली आहे. कोकण वगळता अन्य काही भागांमध्ये दुबार पेरण्यांचे संकट आहेत. हवामान विभागाने व्यक्त केलेल्या पावसाच्या अंदाजामुळे शेतकरी काहीसा सुखावणार आहे.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी धमकी प्रकरण

# सूत्रधार पोलिसांच्या ताब्यात

**नागपूर : प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर शहरातील कार्यालयात धमक्यांचे फोन आल्याने एकच खळबळ उडाली होती. तब्बल तीन वेळा मंत्री गडकरी यांच्या कार्यालयात फोन करून धमकी देण्यात आली. आता या प्रकरणात पोलिसांना आणखी एक यश आले आहे. नागपूर पोलिसांनी सूत्रधार आणि खतरनाक दहशतवादी बशिरुद्दीन नूर अहमत उर्फ अफसर पाशा या दहशतवाद्याला पकडून नागपुरात आणले आहे.

प्रकारणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपास सुरू केला. जयेश पुजारी उर्फ जयेश कांथा या गुन्हेगाराच्या नावाने धमकीचे कॉल आले होते तसेच १० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. जयेश कांथा हा बेळगाव तुरुंगात होता. तुरुंगातातून त्याने फोन केल्याचेही समोर आले होते. नेत्यांच्या



हत्येसाठी बेळगाव जेलमधून काही महिन्यांपूर्वी सुटलेल्या कुख्यात गुन्हेगारांना जयेशने आर्थिक मदत पुरवली. हत्येसाठी लागणारी हत्यारे मिळवून देण्यासाठी जेलमधून जयेशने मदत केल्याची माहिती समोर आली आहे.

यानंतर नागपूर पोलिसांनी बशिरुद्दीन नूर अहमत उर्फ अफसर पाशा याला बेळगाव तुरुंगातून ताब्यात घेऊन नागपुरात आणले आहे. बशिरुद्दीन नूर अहमद उर्फ अफसर पाशा या दहशतवाद्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयातील धमकी प्रकरणात नाव समोर आले आहे. तो कर्नाटकात 'लष्कर-ए-तोयबा'साठी काम करतो. कर्नाटकातील चिकबल्लापूर येथे राहणारा बशिरुद्दीन नूर अहमद उर्फ अफसर पाशा वर ढाका आणि बंगळुरू बॉम्ब ब्लास्टसह जम्मू-काश्मीरात लष्कर-ए-तोयबासाठी दहशतवाद्यांची भरती करण्याचा आरोप आहे.

बशिरुद्दीन हा २००६पासून अटकेत आहे, तर २०१४पासून तो बेळगावच्या तुरुंगात शिक्षा भोगत आहे. मंत्री गडकरी यांच्या कार्यालयात जयेश पुजारी उर्फ शाकिरने जानेवारी आणि मार्च महिन्यात दोन वेळेला धमकीचे फोन केले होते. या मागचा सूत्रधार हा बशिरुद्दीन नूर अहमद उर्फ अफसर पाशा असल्याच्या निष्कर्षापर्यंत नागपूर पोलीस पोहचले आहेत.

**असा काढला माग**

बशिरुद्धीनेच २०१४पासून बेळगाव तुरुंगात असताना हळूहळू जयेश पुजारीचे ब्रेन वॉश करत त्याला कट्टर इस्लामिक विचारसरणीशी जोडले आणि त्यानंतर विविध देशविघातक आणि दहशतवादी कृत्यांसाठी जेलमधून फोनद्वारे बाहेर धमक्या देणे, संपर्क साधण्यासाठी वापरले. जयेश पुजारीची महिला मित्र आणि बेळगाव तुरुंगातील काही कैद्यांनी नागपूर पोलिसांना खात्रीलायक माहिती दिल्यानंतर त्या आधारावरच नागपूर पोलिसांनी गडकरी यांच्या कार्यालयातील धमकीच्या फोनप्रकरणी मुख्य सूत्रधार बशुरुद्दीन नूर अहमद उर्फ अफसर पाशा असल्याचा निष्कर्षापर्यंत पोहचले आहेत.

# पनवेल महापालिकेच्या भरती प्रक्रियेला उदंड प्रतिसाद

## दोन दिवसांत साडेचार हजार अर्ज



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका स्थापन झाल्यानंतर आस्थापनेवर प्रथमच होणाऱ्या भरती प्रक्रियेला उमेदवारांचा प्रचंड प्रतिसाद दिसून येत आहे. अवघ्या दोन दिवसात साडेचार हजारांहून अधिक उमेदवारांनी भरती प्रक्रियेचे अर्ज भरले आहेत.

भरती प्रक्रिया पारदर्शी होणार आहे. प्रशासकीय, अभियांत्रिकी, तांत्रिक, विधी, अग्निशमन सेवा, सुरक्षा सेवा, माहिती व तंत्रज्ञान सेवा, लेखा व वित्त सेवा, उद्यानसेवा, शहर विकास सेवा, यांत्रिकी सेवा, सार्वजनिक आरोग्य सेवा, क्रीडा सेवा, निमवैद्यकीय सेवा, पशुवैद्यकीय सेवा, लेखा परीक्षण सेवा इत्यादी विभागांतील पदांकरिता ही भरती होणार आहे.

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार १३ जुलै रोजी जाहिरात प्रसिद्ध करून गट 'अ' ते गट 'ड'मधील ३७७ रिक्त पदांसाठी सरळ सेवेमार्फत भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. तुलनात्मक स्पर्धेतून निवड प्रक्रिया होण्यासाठी ही जाहिरात देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांना www.panvelcorporation.comhttps://mahadma.maharashtra.gov.inhttps://mahadma. या संकेतस्थळांवर १७ ऑगस्टपर्यंत रात्री ११.५५ वाजेपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येतील. ही परीक्षाही ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. परीक्षेचे ठिकाण आणि वेळ ई-मेल व एसएमएसव्दारे कळविण्यात येईल.

उमेदवारांना ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत इत्यादी बाबतचा तपशिल व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी पालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा/वयोमर्यादा शिथिलता, निवड पद्धत, सर्व साधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतूदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादीबाबतचा तपशिल संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**तक्रार निवारण कक्षाची स्थापना**

उमेदवारांना १३ जुलै ते १७ ऑगस्टदरम्यान त्यांचे अर्ज भरता येणार आहेत. भरती प्रक्रियासंबंधात उमेदवारांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी पालिकेने तक्रार निवारण कक्ष स्थापन केला आहे. या कक्षामध्ये पालिकेच्या कर्मचाऱ्यांची १३ जुलै ते १७ ऑगस्ट या कालावधीकरिता नेमणूक करण्यात आली आहे. उमेदवारांना भरती प्रक्रियासंदर्भात काही अडचण असल्यास ०२२-२७४५८०४२, २७४५८०४१ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यालय उपायुक्त कैलास गावडे यांनी केले आहे.

**सध्या पनवेल महापालिकेची ३७७ पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने होणार असून नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या आमिषांना किंवा प्रलोभनांना बळी पडू नये. भरती प्रक्रियेसंदर्भात कोणत्याही अधिकाऱ्याने, पदाधिकाऱ्याने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे प्रलोभन दाखविल्यास याबाबत त्यांच्याविरुद्ध पुराव्यासह नजीकच्या पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल करावी. परीक्षेच्या बाबतीत कोणतीही शंका असल्यास टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.**
**-गणेश देशमुख, आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

# 'समान नागरी कायदा सर्वांसाठी महत्त्वाचा'

**नाशिक : प्रतिनिधी**

समान नागरी कायदा सर्व धर्मातील स्त्री-पुरुषांसाठी दत्तक विधान, मालमत्ता, विवाह या दृष्टीने महत्वाचा आहे, असे मत विधान परिषदेच्या उपसभापती तथा शिवसेनेच्या उपनेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित होते, त्यानुसारच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काम करीत असल्याने त्यांच्याकडे जाण्याचा निर्णय घेतला, असेही त्यांनी सांगितले.



डॉ. गोऱ्हे शुक्रवारी (दि. १४) नाशिक दौऱ्यावर आल्या असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. उद्धव ठाकरे यांनी समान नागरी कायद्याविषयी आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. या संदर्भात त्यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून माहिती दिली असता त्यांनी कायद्याचा अंतिम मसुदा आल्यावर बोलू, असे सांगितले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी समान नागरी कायद्याविषयी वेळोवेळी आपली भूमिका स्पष्ट केली होती याकडे डॉ. गोऱ्हे यांनी लक्ष वेधले.

महाविकास आघाडी असताना शिंदे गट हा अजित पवार यांच्या कार्यशैलीने त्रस्त होऊन भाजपकडे गेला. आता अजित पवारच भाजप-शिंदे यांच्यासोबत आले. शिंदे हे बेरजेचे राजकारण करीत आहेत. सत्ता एक साधन आहे, असे गोऱ्हे यांनी नमूद केले.

# एमएमआर क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेच्या उत्पन्न मर्यादेमध्ये वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआर)मध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेतील परवडणाऱ्या घरांसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. उत्पन्नाची मर्यादा आता तीन लाखांवरून सहा लाख रुपये करण्यात आली असून या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी कामकाजमंत्री हरदिपसिंह पुरी यांचे आभार मानले आहेत.

या निर्णयामुळे म्हाडा, सिडकोच्या घरांसाठी अर्ज करणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत मुंबई महानगर क्षेत्रासाठी आर्थिक दुर्बल घटकांसठी उत्पन्नाचे निकष तीन लाखांवरून सहा लाख रुपये करण्याची विनंती मुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्राकडे २१ जून २०२३ रोजी पत्राद्वारे केली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याचा पाठपुरावा केला. या विनंतीला केंद्राने सकारात्मक प्रतिसाद देऊन उत्पन्नाच्या निकषात वाढ केली असल्याचे राज्य शासनाला कळविले आहे.

# महाप्रित आणि जीईएपीपीचा ५०० मेगावॅटचा कृषी सौरऊर्जा उपक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) आणि ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट (जीईएपीपी) यांची मुंबईत नुकतीच भागीदार बैठक झाली. यामध्ये महाराष्ट्रात आगामी काळात ५०० मेगावॅट सौर प्रकल्पांवर लक्ष्य केंद्रित करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

या बैठकीदरम्यान महाप्रित आणि जीईएपीपीने पीएम-कुसुम सी/मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी ५०० मेगावॅटच्या निविदेच्या अंमलबजावणीसाठी आराखडा तयार केला आहे. ज्यामुळे महाराष्ट्राला सौरऊर्जेमध्ये २५०० कोटींची गुंतवणूक आणणे, $CO_2$ उत्सर्जन वार्षिक चार लाख टनांनी कमी करणे व एक लाख शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे.



या बैठकीमध्ये महाप्रितचे मुख्य महाव्यवस्थापक दीपक कोकाटे यांनी सौर प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबतची माहिती सादर केली. तसेच प्रकल्प व्यवस्थापन युनिटचे रमणदीप सिंग यांनी सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता येणाऱ्या विविध कामांबाबतची रूपरेषा सादर केली.

ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेटद्वारे प्रकल्प व्यवस्थापन युनिटची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवस्थापन युनिटव्दारे सौरऊर्जा प्रकल्पांची अंमलबजावणी आणि विविध शासकीय विभागांशी समन्वय साधण्याचे काम करण्यात येईल.

या बैठकीत महाप्रितचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, जीईएपीपीचे उपाध्यक्ष सौरभ कुमार यांनी १०० मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्पाची निविदा सूचना महाप्रितच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केली. या बैठकीला विविध वित्त संस्था व प्रकल्प विकासक उपस्थित होते. आभार जीईएपीपीचे संचालक मुकेश खंडेलवाल यांनी मानले.

# महाराष्ट्र नगर परिषद संचालनालयातंर्गत मेगाभरती

**मुंबई : प्रतिनिधी**

सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी महत्त्वाची अपडेट आहे. महाराष्ट्र नगर परिषद संचालनालय अंतर्गत शंभर-दोनशे नव्हे; तर तब्बल १७८२ जागा भरल्या जाणार आहेत. इच्छुक आणि पात्र उमेदवारांना ऑनलाइन माध्यमातून अर्ज करता येणार आहे. २० ऑगस्ट ही अर्ज करण्याची शेवटची तारीख आहे

महाराष्ट्र नगर परिषद संचालनालयातंर्गत स्थापत्य अभियंता गट क-च्या एकूण २९१ जागा भरल्या जाणार असून पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा आणि एमएस-सीआयटी किंवा त्या समतुल्य प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्युत अभियंता गट क-च्या एकूण ४८ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. यासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा आणि एमएस-सीआयटी पूर्ण असणे आवश्यक आहे. कॉम्प्युटर इंजिनीअर गट क-च्या एकूण ४५ रिक्त जागा भरल्या जाणार असून उमेदवाराने इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा पूर्ण करणे आवश्यक आहे.

पाणीपुरवठा जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता गट क-च्या एकूण ६५ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. यासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे मेकॅनिकल/पर्यावरण इंजिनिअरिंग डिप्लोमा आणि एमएस-सीआयटी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. लेखापरीक्षक/लेखापाल गट-कच्या एकूण २४७ रिक्त जागा भरल्या जाणार असून उमेदवार बीकॉम आणि एमसीआयटी पूर्ण असणे आवश्यक आहे. कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी गट क-च्या एकूण ५७९ रिक्त जागा भरण्यात येणार असून यासाठी अर्ज करणारा उमेदवार कोणत्याही शाखेतील पदवीधर असणे आवश्यक आहे.

अग्निशमन अधिकारी गट क-च्या एकूण ३७२ रिक्त जागा भरल्या जाणार असून यासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे कोणत्याही शाखेतील पदवी पूर्ण असणे आवश्यक आहे. स्वच्छता निरीक्षक गट क-च्या एकूण ३५ जागा भरल्या जाणार असून अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे कोणत्याही शाखेतील पदवी असणे आवश्यक आहे.

✻ वयोमर्यादा

महाराष्ट्र नगर परिषद संचालनालय अंतर्गत भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय २१ ते ३८ वर्षांदरम्यान असावे.

✻ अर्ज शुल्क

खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून १००० रुपये परीक्षा फी घेतली जाईल, तर मागासवर्गीय उमेदवारांना यात १०० रुपये सवलत दिली जाणार आहे.

✻ अर्जाची शेवटची तारीख

इच्छुक आणि पात्र उमेदवारांना ऑनलाइन माध्यमातून अर्ज करता येणार आहे. २० ऑगस्ट ही अर्ज करण्याची शेवटची तारीख आहे.

# रानसईच्या बापूजी देव मंदिर परिसरात वृक्षारोपण

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या श्री श्रीक्षेत्र बापूजी देवाच्या मंदिर परिसरात उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या प्रमुख उपस्थितीत २०० झाडांचे शुक्रवारी (दि. १४) रोपण करण्यात आले आहे.

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्ष लागवड काळाची गरज आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून उरण पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारीवृंदाच्या वतीने, चिरनेर रानसई विभागातील बापूजी देवाच्या मंदिर परिसरात विविध प्रकारच्या २०० झाडांची लागवड करण्यात आली आहे. पशु-पक्ष्यांचा या जंगल भागात मोठा अधिवास असून त्यांना उपयुक्त ठरणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

या वृक्षारोपण मोहिमेत उरण पंचायत समितीचे प्रशासक विनोद भिडे, विस्तार अधिकारी सुरेंद्र पालव, आरोग्य विस्तार अधिकारी महेश काळे, कृषी अधिकारी श्री सावळे, कनिष्ठ प्रशासक जितेंद्र चिर्लेकर, कनिष्ठ प्रशासक अंजली वर्तक, सहायक लेखा गिरीराज धिगा, कैलास भोईर, युवराज पाटील, ज्युनियर इंजिनिअर रेश्मा भोईर, ज्युनियर इंजिनिअर श्री. चव्हाण, प्रवीण पाटील, सूर्यकांत पाटील, एम. जयदीप, चिरनेर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश पवार, सामाजिक कार्यकर्ते सचिन घबाडी तसेच चिरनेर ग्रामपंचायतीचे कर्मचारी सहभागी झाले होते.



# रायगडात महसूल अधिकारी रोह्यातील शेताच्या बांधावर

**रोहे : प्रतिनिधी**

सध्या रायगड जिल्ह्यात शेतीची कामे वेगाने चालू आहे. खरीप हंगामाची पीक पाहणी व नोंद ही गाव नमुना १२मध्ये घेणे लवकरच सुरू होणार आहे. शेतकऱ्यांना स्वतःहून पिकांची नोंदणी करण्यासाठी शासन ई-पीक पाहणी कार्यक्रम राबवत आहे. याद्वारे शेतकरी मोबाईलद्वारे आपल्या शेतातील पिकांची नोंद करू शकतात. या मोबाईल ॲपसंबंधी महसुली यंत्रणेने रोहा तालुक्यात शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

खांबेरे या गावी सर्वप्रथम ग्रामपंचायतीमध्ये सभा घेऊन सदस्य व शेतकऱ्यांना पिकांची नोंद महसूल दफ्तरी करून घेणे का आवश्यक आहे आणि पिकांची नोंद मोबाईल ॲपद्वारे कशा पद्धतीने केली पाहिजे याबद्दल अधिकाऱ्यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. त्यानंतर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी या गावातील काही शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन प्रत्यक्ष भात पिकाची पाहणी करून त्याची नोंद मोबाईलद्वारे करून दाखवली.



ई-पीक पाहणी नोंदणीसाठी मार्गदर्शन

पीक पाहणी कशा पद्धतीने केली पाहिजे या संदर्भात उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांच्या सूचनेनुसार अपर तहसीलदार प्रकाश म्हेत्रे, मंडळ अधिकारी गुरुनाथ यमाजी, तलाठी मंगेश साळवी व तेजश्री मोरे यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. या वेळी कृषी सहायक मंगेश भिंगारडे, पोलीस पाटील अभिजित भोईर, कोतवाल महेंद्र चिपळूणकर, काशिनाथ ठाकूर ग्रामपंचायत सदस्य आत्माराम कासार, अतिश मोरे, बबन पडवळ तसेच जितेंद्र जोशी व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा

**उरण : वार्ताहर**

सारडे विकास मंच अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे याचा वाढदिवस अनेक संस्था आणि मित्र परिवारातर्फे साजरा करण्यात आला. यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

फोर लाईफ कंपनी तसेच साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे राकेश पाटील यांच्यातर्फे चिरनेर आदिवासी वाडीवर सावा वॉटर प्युरिफायर कॅन वाटप करण्यात आले. हरिश म्हात्रे तसेच सदाबहार ग्रुपतर्फे कोमनादेवी ऑक्सिजन पार्क सारडे येथे वृक्षारोपण नंदाई प्रतिष्ठान वशेणी डॉ. हिराचंद पाटील यांच्यातर्फे वशेणी येथे वृक्षारोपण उपेंद्र ठाकूर यांच्यातर्फे राजिप शाळा पालेला मुलांना टाय बेल्ट आणि खाऊवाटप राजिप शाळा सारडेला रोहित पाटील, राकेश पाटील, प्रसाद पाटील, डॉक्टर हिराचंद पाटील, त्रिजन पाटील यांच्याकडून सारडे विकास मंचच्या नावाने लेक्चर स्टँड सुयश क्लासेस आवरे निवास गावंड, विराट पाटील, संतोष म्हात्रे याच्यातर्फे ब्राह्मण देव आवरे येथे फुलझाड लागवड, राजिप शाळा गोवठणेला रामनाथ पाटील यांच्याकडून घड्याळ भेट, श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय वशेणीला रोहित पाटीलकडून घड्याळ भेट, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन संस्था उरण तालुका प्रमुख रणिता ठाकूर तसेच सहकारी टीमकडून पुनाडे आदिवासी वाडी तसेच राजिप शाळा कोप्रोली येथे खाऊ वाटप आदी कार्यक्रम घेण्यात आले.



## निवडक

### बंबावीपाडा येथून दुचाकीची चोरी

**पनवेल :** हिरो कंपनीची मोटरसायकल अज्ञात चोरट्याने तालुक्यातील बंबावीपाडा येथून चोरून नेल्याची घटना घडली आहे. राहुल गुप्ता याने त्याची वीस हजार रुपये किमतीची हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटरसायकल (एमएच ४६ बीडब्लू ३९७०) ही बंबावीपाडा येथे उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञाताने ही मोटरसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### टोयाटो शोरूममधून राउटरची चोरी

**पनवेल :** तालुकयातील कोळखे गाव येथील टोयाटो शोरूम मधून राउटर ची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. कोळखे गाव येथील टोयाटो शोरूम मधून चाळीस हजार रुपये किमतीच्या पांढऱ्या रंगाचा जिओ कंपनीचा राउटर अज्ञाताने चोरून नेला आहे. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून याबाबत अधिक तपास शहर पोलीस करत आहेत.

### मोबाईल चोरट्यास नागरिकांनी पकडले

**पनवेल :** ४५ वर्षीय वाहनचालकाच्या हातातील मोबाईल खेचून पळून जाणाऱ्यास नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना पनवेलमध्ये घडली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली येथील वाहनचालक अमित शिंदे हे भाड्यासाठी खांदा कॉलनी येथे आले होते. प्रवाशाला खांदा कॉलनी येथे सोडल्यानंतर पुन्हा भाडे मिळवण्यासाठी ते तक्का रोड येथील नवनाथ मंदिराजवळ आले. ते गाडीच्या खाली उतरून मोबाईलमध्ये पाहत असताना पाठीमागून आलेल्या व्यक्तीने त्यांचा मोबाईल खेचून पळ काढला. त्यावेळी आजूबाजूच्या नागरिकांनी मोबाईल चोरणाऱ्यास पकडले व पनवेल शहर पोलिसांच्या स्वाधीन केले.

### रवींद्र गावंड यांना सेवानिरोप



**उरण :** मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कंपनीतील कामगार रवींद्र मानाजी गावंड शुक्रवारी (दि. १४) हे ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले. ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कारखाना प्रमुख कमलजीत सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली निरोप समारंभ कार्यक्रम झाला. सेवानिवृत्त रवींद्र गावंड यांना सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ, स्वीट देऊन सन्मानित करण्यात आले. युनियनच्या वतीने कामगार रवींद्र गावंड व त्यांच्या पत्नी अनिता रवींद्र गावंड यांनाही भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कारखांना प्रमुख कमलजीत सिंग, प्रोडक्शन मॅनेजर अभय जाधव, अझ्मीनचे गणपत दाटेकर, कामगार संघटना, कामगार प्रतिनिधी, सुपरवायझर, कर्मचारी, गावंड यांचे कुटुंबीय, मित्र परिवार आदी उपस्थित होते.

### मंगेश नेरूळकर जिल्हाध्यक्षपदी

**पनवेल :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांतर्गत नेमणुकांवर भर देण्यात येत असून उपमुख्यमंत्री अजित पवार समर्थक मंगेश नेरूळकर यांची पनवेल शहर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुरज चव्हाण तसेच पक्षाच्या नेत्या आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत हे नियुक्तीपत्र नेरूळकर यांना देण्यात आले. या वेळी युवती काँग्रेसच्या प्रज्ञा चव्हाण, शिवदास कांबळे, रंजीत नरुटे, अजिनाथ सावंत आदी उपस्थित होते.



# पैशांसाठी मित्राचा खून करणारा गजाआड

## आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात पैशाच्या कारणावरुन मित्राचे शिर धडावेगळे करून त्याचा खुन केल्याप्रकरणी एका आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्यात २८ जून २०२३ रोजीपासुन पनवेल येथुन महंमद अस्लम हाश्मद (वय ४२, रा. आशीयाना अपार्टमेंट, पनवेल) हा मिसींग असलेबाबत मुक्करम कसार (रा. नेरूळ) यांनी पोलीस ठाणे येथे दिलेल्या खबरीवरून मोठे मनुष्य मिसींग नं. ६८/२०२३ अन्वये दाखल होती. मिसींगच्या तपासकामी पनवेल शहर पोलिसांचे तपास पथक तयार करण्यात आले. पथकाने मिसींग व्यक्तीच्या शोधकामी मिसींग व्यक्तीचे मोबाईलचे सीडीआर, मिसींग झाले ठिकाणच्या परिसरातील प्राप्त केलेले सीसीटीव्ही फुटेज यांचा तांत्रीक तपास केला.

तपासादरम्यान यातील मिसींग व्यक्तीला त्याचा मित्र नामे शफिक हैदर याच्यासोबत शैवटचे पाहिले असल्याबाबत माहिती समोर आली. त्यावरून शफिक हैदर याच्याबाबत तपास केला असता तो वडघर, पनवेल येथुन अचानक त्याचा मोबाईल बंद करून मुळगावी उत्तरप्रदेश येथे जात असल्याबाबत माहिती समोर आली. त्यावरुन शफिक अली हैदर याच्याबाबत अधिक तांत्रिक तपास करून त्यास तपासपथकाने भोपाळ, मध्यप्रदेश येथे रेल्वेतुन विचारपुस करण्यासाठी



मयत महंमद अस्लम हाश्मद

थांबिवले. त्याच्याकडे यातील मिसींग व्यक्तीबाबत अधिक तपास केला असता त्याने उडवाउडवीची उत्तरे देऊन दिशाभुल करत असल्याचे दिसुन आले. त्यावरुन मिसींग व्यक्तीचे काहीतरी बरेवाईट झाले असल्याबाबत संशय बळावला.

शफिक अली हैदर याच्याकडे तपासपथकाने केलेल्या तपासामध्ये त्याने महंमद अस्लम हाश्मद (वय ४२) याच्याबरोबर पैशांच्या कारणावरुन झालेल्या भांडणाचा व शिवीगाळीचा राग मनात धरून २८ जून २०२३ रोजी पहाटेच्या दरम्यान शॉप नं. ०१, दिप एन्टरप्राईजेस बिल्डींग, प्लॉट नं. ६६, सेक्टर आर-१, चिंचपाडा, पुष्पक नोड, वडघर, ता. पनवेल या ठिकाणी अस्लम याचे मानेवर मासे कापण्याच्या सुर्याने वार करून त्याचे मुंडके धडावेगळे करून खुन केला. खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचे धड ३/४ नायलॉनच्या गोणी एकात एक भरून प्रेत भरुन चिंचपाडा, कळंबोली सर्वीस रोडचे डावे साईडला रस्ताचे कडेला टाकुन दिले व मुंडके करंजाडे येथील नाल्यात टाकले असल्याचे सांगितले.

### धडापासून शीर वेगळे केल्याची कबुली

गुन्ह्यात आरोपी शफिक अली हैदर (वय ४३ वर्षे, रा. वडघर, पनवेल, मूळ रा. उत्तर प्रदेश) यास अटक करण्यात आली असून आरोपीकडे केलेल्या तपासात त्याने मयताचे धड ज्या ठिकाणी टाकले ते ठिकाण दाखवले. त्याप्रमाणे आरोपीच्या सांगण्याप्रमाणे मयताचे मुंडके नसलेले धड मिळून आले आहे. हे धड शवविच्छेदनाकरिता पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे पाठवण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.

## कळंबोलीत एकाला लाखोंचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

प्रीपेड टास्क खेळावयास सांगून भरलेल्या रकमेचा अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून तीन लाख ३७ हजार ४० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार कळंबोली येथे घडला आहे.

सेक्टर ११ कळंबोली येथील प्रशांत गडवीर यांना ऑनलाइन वर्क फ्रॉम होम करणार का, याबाबत विचारणा करण्यात आली. या वेळी लिंक पाठवल्यानंतर त्यांनी काम करण्याचा विचार केला. त्यांना टेलिग्रामवर जॉइन व्हायला सांगितले. या वेळी एक लाइक केल्यानंतर त्यांच्याकडून प्रत्येक टास्क मागे दीडशे रुपये खात्यावर जमा होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांना बँकेचे खाते क्रमांक देण्यात आले. ते आठ ते दहा टास्क खेळले.

या वेळी ६५० रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले, त्यानंतर दुसरी लिंक पाठवून ३० टास्क खेळले. नवीन व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करून काही रक्कम भरल्यानंतर तीस ते चाळीस टक्के अधिक करून पुन्हा रक्कम तुमच्या खात्यावर जमा करणार असल्याचे सांगितले. खात्यावर पुन्हा पैसे पाठवण्यात आले. असे करता करता त्यांनी तीन लाख ३७ हजार ४० रुपये यात भरले, मात्र ही रक्कम परत न देता फसवणूक केली गेली असे त्यांच्या आल्यावर त्यांनी लक्षात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## 'सीकेटी'च्या विद्यार्थिनींनी घेतले स्वसंरक्षणाचे धडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात एनएसएस विभाग व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने १४ व १५ जुलै २०२३ रोजी इयत्ता बारावीच्या मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रशिक्षणात विद्यालयातील एकूण १८० विद्यार्थिनींनी प्रशिक्षण पूर्ण व त्यामध्ये एनएसएसच्या ४० विद्यार्थिनींनी प्रशिक्षण घेतले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५०व्या राज्याभिषेक दिनानिमित्त राज्यातील सर्व महाविद्यालयीन युवतींना हिंसाचाराविरुद्ध मनोबल उंचावण्यासाठी राज्याच्या महिला व बालविकास विभागामार्फत स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.



अलीकडील काळात राज्यात महिला व मुलींच्या होणाऱ्या निर्घृण हत्या व हिंसाचार ही चिंतेची बाब बनली आहे. बदलत्या काळानुसार महिलांच्या बदललेल्या समस्या तसेच महिला व मुलींवरील होणाऱ्या अत्याचारास आळा बसण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे खूपच आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात नितीन बोराडे, शालिनी लोधी, निकिता मांडवकर, अरुणा दडस, काजल दोरगे या प्रशिक्षकां मार्फत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. युवतींनी आपले स्वसंरक्षण कसे करावे? तसेच प्रतिकार कसा करावा? यासंबंधी त्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणासाठी प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयाची परंपरा राखत पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत चांगलीच बाजी मारली आहे. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

पूर्व उच्च प्राथमिक म्हणजेच इयत्ता पाचवीच्या सेजल निलेश शेळक, शर्वरी नितीन जाधव या दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. तर पूर्व माध्यमिक म्हणेजच इयत्ता आठवीच्या ऋत्विक शिवदास पाटील, आदित्य अशोक पावले, सोहम सुधीर इंदुलकर, वैष्णव गणेश आहेर, आदित्य समीर कोळी, ऋतुजा नरेंद्र म्हात्रे या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे.

यानिमित्त संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुछ देऊन अभिनंदन केले. या वेळी मुख्याध्यापक संतोश चव्हाण उपस्थित होते.

## तुपगाव ग्रामपंचायत हद्दीतील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत तुपगांवच्यावतीने १५ जुलै जागतिक कौशल्य दिनाचे औचित्य साधून प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून गावातील युवक युवतींना प्लंबरचे प्रशिक्षण व प्रदर्शन शनिवारी (दि. १५) भरविण्यात आले होते. यापुढे प्रशिक्षण कार्यशाळाही तुपगावात सुरू करण्यात येणार असल्याचे सरपंच रवींद्र कुंभार यांनी सांगितले.

प्रशिक्षण मोफत असून हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगाराची संधी देखील प्रथम एज्युकेशन फाउंडेशन च्या माध्यमातून निर्माण होणार आहे तसेच या कोर्ससाठी वयाची अटही १८ ते ३० वयोगटातील युवक युवतींसाठी असणार आहे. तसेच प्लंबरचे प्रशिक्षण हे सरकार मान्य असून हा कोर्स पूर्ण झाल्यानंतर तुम्हाला त्याचे सरकार मान्य सर्टिफिकेटदेखील प्रथम एज्युकेशन फाउंडेशनकडून



सरपंच रवींद्र कुंभार यांचा पुढाकार

मिळणार आहे. ३० दिवसांचा हा कोर्स असणार आहे. सकाळी ९:३० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मराठी शाळा तुपगाव येथे कोर्स असणार आहे.

या वेळी सर्व युवकांना युवतींना कृष्णा देवगुडे, ट्रेनर दिनेश पवार प्लेसमेंट, भूषण भूषण थोराट ट्रेनर यांनी सर्वांनी शिबिरामध्ये प्रदर्शनाची व सर्व स्टूलची माहिती दिली. या वेळी अनेक तरुणांनी नाव नोंदणी केली.

या कार्यक्रमासाठी सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, ग्रामपंचायत सदस्य सचिन साखरे, माजी सरपंच महेश परीट, हभप वसंत महाराज कुंभार, तंटामुक्ती अध्यक्ष योगेश गुरव, भाजप आरोग्य सेल खालापुर अध्यक्ष विजय ठोसर, कुंभार समाज युवक अध्यक्ष स्वप्निल नागावकर, उपशाखा प्रमुख मनोज गुरव, सामाजिक कार्यकर्ते उमेश साळवी, देवेंद्र कुंभार, चंद्रकांत कुंभार तसेच गावातील युवक उपस्थित होते.

तुपगावचे गावातील ग्रामस्थ व युवक युवती यांनी हा उपक्रम सरपंचांनी राबवला त्याबद्दल त्यांनी सरपंचाचे आभार मानले. सरपंच रवींद्र कुंभार आल्यापासून अनेक चांगले उपक्रम चांगली कामे गावामध्ये होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## महात्मा फुले कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पाहिले चांद्रयान ३ उड्डाणाचे प्रक्षेपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेलमधील महात्मा फुले ए. एस. सी. महाविद्यालयामध्ये शुक्रवारी (दि. १४) भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोचे चांद्रयान-३ मोहीमेचे थेट प्रक्षेपण आयोजित करण्यात आले होते.

थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सीनियर विभागाचे उपप्राचार्य डॉ. मढवी, डॉ. पाटील व जु. विभागाच्या उपप्राचार्य प्रा. शिधावतंम पी. ए. मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली बारावी सायन्स वर्गातील विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेच्या हॉलमध्ये संधी उपलब्ध करून देण्यात आली.

चांद्रयान- ३ मुळे चंद्रावरती माहिती मिळणार आहे तेथील जमीन पाणी वातावरण याचा उलगडा होणार आहे. यासाठी भौतिकशास्त्र सीनियर विभागाचे प्रमुख प्रा. एस. एल. गायकवाड, प्रा. डॉ. एस. जी. गुंड, प्रा. आर. डी. मुरबेकर प्रा. ए. वाय. धोडी, ज्यु. इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख एस. व्ही. देशपांडे, भौतिकशास्त्रज्ञ विभागाचे विभाग प्रमुख प्रा. पी. व्ही. कठारे, प्रा. आर. ए. वानखेडे, प्रा. आर. ए. नावडकर, प्रा. जी. ए. करवंदे आदी उपस्थित होते.



## गव्हाण विद्यालयाची दीक्षा वर्तक जिल्हा गुणवत्ता यादीत चौथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांचा निकाल व गुणवत्ता यादी जाहीर झाली असून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील दीक्षा रमेश वर्तक ही विद्यार्थिनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये रायगड जिल्ह्यात चौथी आली.



दीक्षा वर्तक रायगड जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत (राष्ट्रीय ग्रामीण सेट ए) चौथा क्रमांक व पनवेल तालुक्यात ग्रामीण मध्ये प्रथम क्रमांक मिळवून शिष्यवृत्ती धारक ठरली आहे. या परीक्षेला इयत्ता आठवीचे विद्यालयातून २० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. तसेच इयत्ता पाचवी मधून १२ परीक्षेला बसले होते त्यातून दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

दीक्षा वर्तक व इतर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आदींनी अभिनंदन केले तसेच या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या विभाग प्रमुख व विषय शिक्षिका डी. आर. वर्तक, माळी मॅडम, एस. के. भोईर, आर. एस. भोईर व सी. एन. ठाकूर या सर्वांचे ही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## रसायनीमध्ये पत्रकारांतर्फे शेतकऱ्यांचा बांधावर सत्कार




**रसायनी : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा प्रेस क्लबच्या वतीने प्रगतीशील शेतकऱ्यांचा सत्कार रसायनी प्रेस क्लबने शेतात जावून करण्यात आला. या वेळी नंदकुमार लडकू पाटील व रवींद्र धनाजी ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला.

रसायनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रूघ्न माळी, सावळे सरपंच सुनील माळी, माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार आणि दत्ता जांभळे, माजी पोलीस निरीक्षक बाळासाहेब यादव, योगेश वर्तक, प्रल्हाद ठाकूर, मधुकर गायकर, धनाजी ठाकूर, मराठी पत्रकार परिषदेचे कोकण विभागीय सचिव अनिल भोळे, रसायनी प्रेस कलबचे अध्यक्ष नागेश कदम, रायगड प्रेस क्लबचे सल्लागार बी. एस. कुलकर्णी, बाळासाहेब सावर्डे, आनंद पवार, कैलास याज्ञिक आदी उपस्थित होते.

# काही चित्रपटांची नावे जपलीत तर बरं होईल...

**'दो आंखे बारह हाथ' असं म्हणताक्षणीच पटकन डोळ्यासमोर गोविंदा आला तर तुमच्यात काही तरी 'केमिकल लोच्या' झालाय असा एव्हाना निष्कर्ष निघालाच समजा. 'दो आंखे बारह हाथ' (१९७५) म्हणताच चित्रपती व्ही. शांताराम अभिनीत व दिग्दर्शित राजकमल कलामंदिर निर्मित क्लासिक चित्रपट त्याच्या थीम, अभिनय, गीत संगीत व नृत्यासह आठवणारच असाच त्याचा सर्वकालीन प्रभाव आहे.**









शांतारामबापूंनी साकारलेली जेलर आदिनाथ ही व्यक्तीरेखा आणि जोडीला संध्या, उल्हास, बी. एम. व्यास, शंकरराव भोसले, बाबूराव पेंढारकर इत्यादींच्या भूमिका. भरत व्यास यांच्या गीतांना वसंत देसाई यांचे संगीत. आणि त्यातील ऐ मालिक तेरे बंधे हम, उमड घुमड कर आहे रे घटा, सैयां झूठो का बडा सरताज निकला या गाण्यांची सर्वकालीन लोकप्रियता. जमेच्या बाजू सांगाव्यात तेवढ्या थोड्याच. उगाच काही चित्रपट महान बनत नाहीत.

व्ही. शांताराम यांचा दिग्दर्शनीय टच श्रेयनामावलीत आणि प्रतिकात्मक दृश्यातही हा नेहमीचाच हुकमी फंडा. रसिकांच्या किमान चार पिढ्या ओलांडूनही ही महान कलाकृती तेवढीच लोकप्रिय आहे, अंतर्मुख करते. तरी आजच्या डिजिटल पिढीने गुगलवर जात एव्हाना 'दो आंखे बारह हाथ'मध्ये गोविंदाच आहे याचा शोध त्यांना एव्हाना लागला असेल. १९९७ साली याच नावाचा हा चित्रपट कधी आला आणि त्याहीपेक्षा तो कधी गेला हे समजलेच नाही. (याच आठवड्यात या गोष्टीला सव्वीस वर्ष झालीत) मुळात भारतीय चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील माईल स्टोन चित्रपटाची नावे पुन्हा आपल्या चित्रपटाला घ्यायची/द्यायची हिंमत होतेच कशी? आपण एका दर्जेदार चित्रपटाच्या नावाचा विनाकारण वापर/ गैरवापर करतोय याचे भान नसते की आपल्या चित्रपटाच्या थीमला हेच नाव परफेक्ट आहे या अट्टाहासातून ते दिले जाते? मुळात चित्रपटावर बेहद्द प्रेम असेल तर काळ कोणताही असो, थीम कितीही भारी असो, कोणताही निर्माता अथवा दिग्दर्शक काहीही झालं तरी मदर इंडिया, मुगल ए आझम, गंगा जमुना, नवरंग, झनक झनक पायल बाजे, दिल एक मंदिर, गाईड, कागज के फूल, संगम, मेरा नाम जोकर, जॉनी मेरा नाम, पाकिजा, आनंद, हाथी मेरे साथी, जंजीर, अभिमान, नमक हराम, बॉबी, दीवार, शोले, अमर अकबर न्थनी, मुकद्दर का सिकंदर, सिलसिला, सागर, तेजाब, हम आपके है कौन, दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे अशा हिंदी आणि जगाच्या पाठीवर, साधी माणसं, सोंगाड्या, पिंजरा, पांडू हवालदार, सामना, सिंहासन, बहुरुपी, अशी ही बनवाबनवी, माहेरची साडी या नावाचा चित्रपट पुन्हा निर्माण करणार नाहीत अथवा करुदेखिल नये. या प्रत्येक चित्रपटाचे आपलं एक व्यक्तिमत्व आहे, अगदी नाव घेताच पोस्टरपासून गाण्यांपर्यंत बरंच बरंच डोळ्यासमोर येतेच. अनेक फिल्म दीवाने तर या चित्रपटातील अनेक प्रसंग संवादासह सांगतील. कुठे पाहिला येऊन बिलगते आणि आपल्या प्रेमातील असोशी व्यक्त करते हे डोळ्यासमोर घडतेच आणि हाच आर. के. फिल्मचा ट्रेड मार्क आहे हेही या चित्रपटाचे देणे आहे. बॉबी देओलने 'बरसात' नावाच्या चित्रपटात चक्क दोनदा भूमिका केली हे सांगावे लागतेय. त्याच्या पहिल्याच चित्रपटाचे नाव 'बरसात ' होते. ते त्याचा पिता धर्मेंद्रने रणधीर कपूरकडून मागून घेतल्याचा किस्सा गाजला. याच चित्रपटातून करिश्मा कपूर चित्रपटसृष्टीत येत असल्याने एका पित्याची इच्छा दुसर्या पित्याने पूर्ण केली. आणि दिग्दर्शक शेखर कपूर सुखावला. पिता आणि पाल्य हे दोघेही स्टार असल्याने हा मुहूर्त दणक्यात रंगला, त्याचा 'रंग ' उतरण्यापूर्वीच शेखर कपूर व करिश्मा यांनी हा चित्रपटच सोडला आणि त्यांच्या जागी राजकुमार संतोषी व ट्विंकल खन्ना आले.

हेही सांगतील. सत्तेच्या राजकारणात अनेकदा ' सिंहासन' चित्रपटाचा छोट्या छोट्या संवादासह उल्लेख होतोच. कितीही प्रेम त्रिकोण आले तरी 'संगम'चा ठसा कायमच. (यातील काही नावांचे चित्रपट उदा. हाथी मेरे साथी, फार ग्रेट नसतील, पण तरी त्यांची आपली एक ओळख आहे हे महत्वाचे.)

किस्मत, अंदाज, दाग, बरसात, औलाद, बाजी अशा नावाचे चित्रपट पुन्हा पुन्हा पडद्यावर आले तरी काही मूळ चित्रपटांचे ग्लॅमर कायम राहिले. 'बरसात' म्हटलं की एका उत्कट प्रणय भावनेने नर्गिस व्हायोलिन वाजवत असलेल्या राज कपूरला

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

तसा तर २००२ साली ए. मुथ्यू दिग्दर्शित चक्क 'प्यासा' नावाचा चित्रपट आला आणि लक्षात न राहता गेलादेखील. विश्व सुंदरी युक्ता मुखीमुळे मला या चित्रपटाची निर्मिती समजली. त्या काळापर्यंत लॅन्ड लाईन फोनचा वापर सेलिब्रिटीज करीत. युक्ता मुखीच्या आईने मला अशा फोनवर सांगितले, मढला कॅप्टन बंगल्यात युक्ता 'प्यासा'चे शूटिंग करतेय, तिकडे तुम्हाला ती मुलाखतीसाठी भेटेल...सेटवर जाईपर्यंत या चित्रपटाचे नाव 'प्यासा' नसावे, आपल्या ऐकण्यात काही चूक झाली असेल असे मी स्वतःलाच समजवत होता. 'प्यासा' म्हणजे फक्त आणि फक्त गुरुदत्त हे मी गल्लीत चित्रपट एन्जॉय करु लागलो तेव्हापासूनचे घट्ट समीकरण, पण मला धक्का बसला हो. खरोखरच पुन्हा एकदा 'प्यासा' बनत होता.

आपण चित्रपट रसिक चित्रपटावर जेवढे आणि जसे निस्सीम प्रेम करतो, चित्रपटाचे नाव घेताच 'फ्लॅशबॅक 'मध्ये जातो नि रमतो तसं नंतरच्या काळात फिल्मवाल्यांचे नव्हते. त्यांना आपल्या पिक्चरला एक नाव हवे असते. म्हणून तर 'राम और श्याम ' नावाचा चित्रपट पुन्हा एकदा आला होता. सम्राट आणि माणिक बेदी असे राम श्याम होते. बस्स इतकीच या चित्रपटाची आठवण. तीही नकोशी. 'राम और श्याम' म्हटल्यावर भिन्न स्वभावाचा डबल रोल साकारणारा दिलीपकुमार आठवणार नाही असे होणारच नाही. वहिदा रेहमान, मुमताज व क्रूरकर्मा प्राणही चाबकासह आठवणार.

आज अनेक जुने चित्रपट यू ट्यूबवर आहेत. काही गाण्यांच्या रुपाने काळासोबत पुढे चाललेत. ते तारीख व वर्षाने जुने झालेत इतकेच. ते कायमच आजचे असतात.

चित्रपट निर्मात्यांची संस्था इम्पात फी भरुन नवीन चित्रपटाचे नाव नोंदवावे लागते. आपला चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही त्याच्या नावाचे हक्क आपल्याकडेच रहावेत म्हणून पुन्हा फी भरावी लागते. त्रिमूर्ती फिल्मचे गुलशन रॉय यांनी ती भरल्याने संजय दत्तच्या 'जॉनी' या चित्रपटाचे नाव 'जॉनी आय लव्ह यू' असे करावे लागले. याचं कारण, विजय आनंद दिग्दर्शित 'जॉनी मेरा नाम 'चे निर्माते गुलशन रॉय होते. शेखर कपूरलाही आपल्या दिग्दर्शनातील 'जोशीले ' या चित्रपटाचे नाव 'जोशीले जोशीले ' असे करावे लागले. तोपर्यंत शेखर कपूरने हाही चित्रपट सोडला. गुलशन रॉय यांनीच यश चोप्रा दिग्दर्शित 'जोशीला 'ची निर्मिती केली होती. आपण निर्माण केलेल्या चित्रपटांच्या नावाचे कायमस्वरुपी हक्क आपलेच आहेत हा व्यावसायिक खमकेपणा प्रत्येकात हवाच हवा.

ते काही असो. हम दोनो नावाचा चित्रपट चक्क तीनदा आला तरी आठवणीत देव आनंदचाच राहिलाय. कारण मूळ नाणे खणखणीत आहे. आता नवीन नाव आणायचं कुठून ही समस्या असेल म्हणून काय जुनेच नाव घ्यायला हवे असे नाही. प्रत्येक भाषेत शब्दसंग्रह अक्षरश: प्रचंड आहे, त्यात नक्कीच शोध घेऊ शकता.

पण चित्रपट रसिकांच्या मनातील नावाच्या प्रतिमेला उगाच धक्का लावू नका. स्वतःची नवीन ओळख निर्माण करता येणार नाही, मग कशाला हवा तो खटाटोप?













# स्मृती रामदास बोट दुर्घटनेच्या

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले, पण भारताला स्वातंत्र्य होण्याआधीच महाराष्ट्रावर मोठा आघात झाला होता. देश स्वातंत्र्याचा जल्लोष साजरा करीत असताना मुंबई, रेवस, अलिबाग, नांदगाव, माणगाव आणि परिसरातील लोकांचा आक्रोश थांबत नव्हता. १७ जुलै १९४७चा दिवस महाराष्ट्रासाठी काळ बनून आला. त्या दिवशी गटारी अमावस्येचा दिवस होता. सकाळी ८ वाजता मुंबईतील भाऊचा धक्क्याकडून रेवस येथे जाण्यासाठी एमएस रामदास बोट निघाली, मात्र त्याआधीच बोटीला जलसमाधी मिळाली. या घटनेला उद्या (सोमवारी) ७६ वर्षे पूर्ण होत आहेत.

एसएम रामदास बोटीवर स्थानिकांसह, व्यापारी, मच्छमार अलिबागला जाण्यासाठी निघाले होते. रामदास बोटीने मुंबई बंदरापासून ७.५ किलोमीटर अंतर कापले होते. ८ वाजून ३५ मिनिटे झाली होते. त्याचवेळी मुसळधार पाऊस सुरू झाला. बोट वेगाने अंतर कापत होती, पण सोसाट्याचा वारा आणि उसळलेल्या लाटांमुळं बोट काशाच्या खडकांजवळ कलली. हळूहळू बोटीत पाणी भरू लागले. बोटीत पाणी भरत असल्याचे पाहून प्रवासी घाबरुन सैरावैरा पळू लागले. बोटीत लाइफ जॅकेटची संख्याही कमी होती. जीव वाचवण्यासाठी प्रत्येकजण धडपडू लागला.

बोटीचा कॅप्टन प्रवाशांना शांत राहण्याची सूचना देत होता, तर एकीकडून बोट समुद्रात बुडण्यापासून वाचवण्यासाठी त्याचा खटाटोप सुरू होता. त्याचवेळी रामदास जहाज गल्स दीपजवळ पोहचले होते. एका महाकाय लाटेने जहाज पाण्यात कलंडले. कॅप्टनला सावरण्याचा वेळ मिळेपर्यंत पाणीपूर्णपणे जहाजात शिरले होते. ज्यांना पोहता येत होते त्यांनी पटापट समुद्रात उड्या घेतल्या. तर काही जण बोटीतच फसले. साधारण ९च्या सुमारास ही दुर्घटना घडली.

रामदास बोट दुर्घटना घडली तेव्हा जहाजात ६७३ प्रवासी होते. चार अधिकारी, ४९ खलाशी आणि हॉटेलचे कर्मचारी होते. साधारणतः मुंबईहून रेवासला पोहचण्यासाठी १.३० तासांचा अवधी लागतो, मात्र जहाज बुडाल्याची माहिती संध्याकाळी ५पर्यंत कोणालाही नव्हती. ज्यांना पोहोता येत होतं त्यांनी मुंबईला जाऊन अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली. त्या वेळी ६२५ जण समुद्रात बुडून मरण पावले होते, तर ६० जणांचे लाइफ जॅकेट व त्यांना पोहता येत असल्याने जीव वाचले होते. त्यात रामदास बोटीचा कप्तान शेख सुलेमान याचादेखील जीव वाचला होता.

साधारणत: रेवसला इतके लोक मुंबईहून एका वेळेस कधीच जात नसत, पण १७ जुलै १९४७ रोजी गटारी अमावस्या असल्याने त्या दिवशी गावातील घरी जाण्यासाठी उतारूंची खूप गर्दी झाली होती. रामदास बोटीची त्या वर्षीच नाविक अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली होती व बोट चांगल्या स्थितीत असल्याचे तिला प्रमाणपत्रही मिळाले होते. सरकारी वर्गवारीत ही बोट नवव्या प्रतीची होती. बुडालेल्या रामदास बोटीचे काही अवशेष अपघातानंतर सुमारे दहा वर्षांनी म्हणजे १९५७मध्ये मुंबईतील बेलॉर्ड पिअरच्या समुद्रकिनाऱ्यावर वाहत आले होते.







# माणसे तोडायची नाही, तर जोडायची...



आपल्याला चिवडा बनवायचा आहे, परंतु आपल्याकडे कडीपत्ता नसेल तर आपण चविष्ट चिवडा बनवू शकत नाही. त्यामुळे चिवडा बनवताना कडीपत्ताचे महत्त्व अगण्यसाधारण आहे. कारण कडीपत्ता नसेल तर चिवडा, चिवडा वाटत नाही. त्यामुळे चिवडा बनवताना सर्वात आधी कडीपत्ता टाकला जातो. कडीपत्तामुळे चिवड्याला छान चव येते, सुगंध येतो, परंतु जेव्हा चिवडा बनून तयार होतो आणि चिवडा खाण्याची वेळ येते तेव्हा मात्र सर्वांत आधी कडीपत्ता अलगदपणे बाहेर फेकला जातो. बऱ्याचदा अनेक माणसाच्या बाबतीतसुद्धा असच घडत असते.

माणसे काम झाली की सोडून जातात अशी अनेकांची तक्रार असते. बरोबर आहे. कारण मुळात अनेकांचा स्वभावच तसा आहे. त्यामुळे स्वतःच्या कामासाठी आपल्याच माणसाचा वापर हल्ली वाढलेला आहे. काम काढून घेतपर्यंत छान राहायचे आणि काम झाले की घान वागायचे असा कार्यक्रम हल्ली आपल्या आजूबाजूला असलेल्या लोकांचा असतो, परंतु असे जर आपल्या बाबतीत घडत असेल आणि समोरची माणसे जर कमापूरते आपला वापर करत असतील तरीही निराश होऊ नका, कुणाला दोष सुद्धा देऊ नका. कारण वापर चांगल्या वस्तूचाच होतो गंज लागलेल्या नाही.

आपल्या छोट्याश्या अशा आयुष्यात अनेक माणसांचा सहवास आपल्याला लाभत असतो. काही माणसे चांगला अनुभव देतात तर काही माणसे वाईट. परंतु आपण चांगल्या माणसांचा विचार करण्यापेक्षा ज्यांनी घाव दिले त्यांचाच अधिक विचार करतो. त्यामुळे आपण निराश होतो, तणावात राहतो. त्याने माझा वापर करून घेतला म्हणून स्वतःला त्रास करुन घेतो. छोट्या छोट्या गोष्टीचे किती भांडवल करत असतो ना आपण. पण लहान सहान गोष्टीचे भांडवल करत बसण्यापेक्षा ते तिथेच सोडून पुढे जात राहणे कधीही चांगले असते. कारण साचून राहण्यापेक्षा वाहत राहिले तर आयुष्याला सुंदर असे वळण मिळते. म्हणून माणसाने नेहमी प्रवाही असावे.

मी शेवटी बाहेरच फेकल्या जाणार आहे म्हणून कडीपत्ता रुसून बसत नाही. तो त्याची भूमिका योग्य रित्या पार पाडतो. अगदी आपणही असेच करावे. शेवटी आपली माणसेच आपल्याला काम झाल्यावर विसरणार आहेत, सोडून जाणार आहेत. हे मोठ्या मनाने स्वीकारून आपण आपली भूमिका योग्य पद्धतीने पार पाडली पाहिजे. कारण कधी कधी आपल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे काम अडत असेल तर आपण दोन पाऊले मागे घेतले तर आपले फार मोठे नुकसान होत नसते. म्हणून माणसाने संकुचित विचार ठेवण्यापेक्षा सर्वागीण विचार केला पाहिजे. कारण आपल्याला माणसे तोडायची नाही तर जोडायची आहेत. बऱ्याचदा आपणही काम पडल्यावर अनेकांचा आधार शोधतो आणि आपले काम झाले की, मग हळुहळू त्या माणसांना आपल्या नजरेआड करतो. आता आपण कितीही नाही म्हणू तरीही आपणही कळत नकळतपणे आयुष्याच्या प्रवासात आपल्या माणसाचा वापर स्वतःच्या कामासाठी करून घेतलेला आहे. हे सत्य नाकारता येत नाही. त्यामुळे आयुष्याच्या या प्रवासात कधी कधी आपण समोरच्या व्यक्तीचा कडीपत्ता करतो तर कधी कधी आपला कडीपत्ता होतो. कारण आयुष्याचा हा प्रवास असाच असतो. त्यामुळे कधी रडत रडत तर कधी हसत हसत जगायचे असते.

**–सुरज दहागावकर, चंद्रपूर**

# महान हॉकीपटू धनराज पिल्ले







दिग्गज हॉकीपटू धनराज पिल्ले यांचा आज वाढदिवस. भारतीय इतिहासातील महान फील्ड हॉकी खेळाडूंपैकी एक म्हणून त्यांना ओळखले जाते. त्याची अतुलनीय कौशल्ये, खेळाबद्दलची आवड आणि अथक दृढनिश्चयाने त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत आणि देशभरातील महत्त्वाकांक्षी क्रीडापटूंसाठी त्याला प्रेरणा मिळाली आहे.

धनराज पिल्ले यांचा जन्म १६ जुलै १९६८ रोजी महाराष्ट्रातील पुण्याजवळील खडकी या छोट्याशा गावात एका विनम्र कुटुंबात झाला. त्यांचे वडील नागलिंगम पिल्ले एका कारखान्यात पर्यवेक्षक म्हणून काम करीत होते, तर त्यांची आई अंदलम्मा गृहिणी होती. दोन भाऊ आणि दोन बहिणींसह धनराज पाच भावंडांमध्ये तिसरा होता.

लहानपणापासूनच धनराजचा खेळाकडे नैसर्गिक कल होता. हॉकी हा लोकप्रिय खेळ असलेल्या खडकीमध्ये लहानाचा मोठा झाल्यावर त्याला सुरुवातीच्या काळातच या खेळाची ओळख झाली. त्याच्या मित्रांच्या प्रोत्साहनामुळे त्याने स्थानिक शेजारच्या रस्त्यावर हॉकीचे सामने खेळण्यास सुरुवात केली. त्याच्या अपवादात्मक कौशल्ये आणि उत्साहाने स्थानिक प्रशिक्षक आणि वरिष्ठ खेळाडूंचे लक्ष वेधून घेतले, ज्यांनी त्याची क्षमता ओळखली.



वयाच्या दहाव्या वर्षी, धनराजने पुण्यातील भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) केंद्रात हॉकीचे औपचारिक प्रशिक्षण सुरू केले. अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्याने खेळाच्या मूलभूत गोष्टींवर लक्ष केंद्रित करून आपल्या कौशल्यांचा सन्मान केला. धनराजचे समर्पण आणि अथक सराव सत्र लवकरच सार्थकी लागले आणि त्याने वेगाने प्रगती केली.

१९८३मध्ये ज्युनियर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये जेव्हा त्याने महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व केले तेव्हा धनराजचा उदय झाला. या स्पर्धेतील सर्वात तरुण खेळाडू असूनही त्याने महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला, ज्यामुळे महाराष्ट्राला विजेतेपद मिळवण्यात मदत झाली. १९९४मध्ये हिरोशिमा, जपान येथे झालेल्या आशियाई खेळांमध्ये धनराजची सर्वात संस्मरणीय कामगिरी होती. त्याने भारताच्या सुवर्णपदक विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्याने महत्त्वपूर्ण गोल केले आणि संपूर्ण स्पर्धेत अपवादात्मक सहाय्य केले. त्याच्या कामगिरीने त्याला स्पर्धेतील सर्वात मौल्यवान खेळाडू ही पदवी मिळवून दिली आणि त्याला राष्ट्रीय नायकाचा दर्जा दिला.

धनराज पिल्ले यांचे भारतीय हॉकीमधील योगदान योग्यरित्या ओळखले गेले आणि त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. १९९९मध्ये भारतातील सर्वोच्च क्रीडा सन्मान, राजीव गांधी खेल रत्न यासह त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांना अनेक पुरस्कार आणि प्रशंसा प्राप्त झाली. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना २००१मध्ये भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक पद्मश्रीदेखील प्रदान करण्यात आला.

# रायगडच्या विकासासाठी काम करणार -मंत्री आदिती तटकरे

**पाली सुधागड येथील अंगणवाडी केंद्राची पाहणी**



**पाली : प्रतिनिधी**

नवनियुक्त महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी शनिवारी (दि. १५) पाली सुधागड येथील अंगणवाडी केंद्राची पाहणी केली. तसेच नानोसे सुधागड येथील महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत नानोसे येथील शेळी प्रकल्पास भेट दिली व बचत गटाच्या महिलांशी चर्चा केली. या वेळी आदिती तटकरे म्हणाल्या की जिल्ह्याच्या विकासासाठीच काम करणार असल्याचे सांगितले.

महिला व बालकांच्या उत्कर्षासाठी नवनवीन अभिनव व उपयुक्त अशा योजना राबविणार असून या सर्व योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आदिती तटकरे म्हणाल्या. रविवारी मंत्रालयाच्या दालनात विभागाची बैठक घेऊन महिला व बालकांच्या प्रश्नांचा आढावा घेतला जाणार असल्याचे तटकरे म्हणाल्या.

दरम्यान महिला व बालकल्याण मुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला सुचिक यांनी महिला व बालक यांच्या संदर्भात संपूर्ण जिल्ह्याचा आढावा दिला. या वेळी चिमुकल्यानी आदिती तटकरे यांचे स्वागत केले. आदिती तटकरे यांनी लहानग्यांसोबत गोड संवाद साधला. पाली सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार, पंचायत समिती कृषी अधिकारी अशोक महामुनी, आंगणवाड़ी सेविका यांच्या वतीने साक्षी दिघे यांनीदेखील आदिति तटकरे यांचे स्वागत केले.

या वेळी महिला व बालकल्याण मुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला सुचिक, राष्ट्रवादी काँग्रेस सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे, सुधागड महिला आघाडी प्रमुख रुपाली भणगे, पाली शहर अध्यक्ष ललित ठोंबरे, उपाध्यक्ष अंकुश आपटे, ज्येष्ठ मार्गदर्शक दादा (प्रकाश) कारखानीस, ग. रा. म्हात्रे, सुनील राऊत, इसाक पानसरे, गटनेते नगरसेवक सुलतान बेणसेकर, नगरपंचायत सभापती सुधीर भालेराव, नगरसेवक आशिक मनियार, नगरसेविका नलिनी म्हात्रे, मधुरा वरंडे, सुजाता वडके, माजी सभापती शुभांगी कारखानीस, माज़ी सभापती साक्षी दिघे, महम्मद धनसे, सखाराम दिघे, अस्मिता घरत, किरण खंडागळे, महेश खंडागळे,दत्ता काटकर, दिनेश बुरुमकर, सुधीर केदारी, समीर वरंडे, पप्पू परबलकर, इसाक पानसरे, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**'पालकमंत्री कुणीही झाला तरी चालेल'**

*दरम्यान, रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाबाबत सुरू असलेल्या चर्चांवर बोलताना मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटले की, रायगडचा पालकमंत्री कुणीही झाला तरी चालेल. जिल्ह्याच्या भवितव्य व विकासासाठीच मी काम करेन.*

# खोपोलीमधील विरेश्वर मंदिरात दानपेटी फोडून चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील पेशवेकालीन विरेश्वर मंदिरात शुक्रवारी (दि. १४) चोरट्यांनी दानपेटीचा कुलूप तोडून दानपेटीतील रक्कम चोरी केल्याची घटना घडली. पहाटे पुजारी नियमितपणे मंदिरात आल्यावर त्यांना हा प्रकार निदर्शनास आला. या वेळी मंदिर कमिटी सदस्य तातडीने मंदिरात आल्यानंतर पोलीस ठाण्यात माहिती कळविली.

चोरट्यांनी शुक्रवारी मंदिराच्या आणि गाभाऱ्यांचा कुलूप तोडून मंदीरात प्रवेश करून दानपेटीचा कूलूप तोडून दानपेटीतील रक्कम चोरी केली आहे. यादरम्यान दानपेटी फोडण्यासाठी आणलेले स्क्रुड्राव्हर, पकड मंदिरात ठेवली होती. पहाटे साडे पाच वाजण्याच्या सुमारास पुजारी किशोर शिगवण मंदिरात आल्यावर त्यांना हा प्रकार निदर्शनास आला. या वेळी मंदिर कमिटी तातडीने मंदिरात आल्यानंतर पोलीस ठाण्यात माहिती कळविली. घटनेची माहिती कळताच खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खोपोली पोलीस ठाण्याचे वरीष्ठ निरीक्षक शितल राऊत या घटनेची कसून चौकशी केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरू आहे.



# इंदापूर येथे संत नामदेव महाराज पुण्यतिथी



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील इंदापूर येथे श्री रखुमाई संयुक्त संत नामदेव महाराज व दत्त मंदिरात नामदेव शिंपी समाजातर्फे शनिवारी (दि. १५) संत नामदेव महाराज पुण्यतिथी भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त इंदापूर नामदेव शिंपी समाजाच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेले संजयआप्पा ढवळे यांचा समाजातर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित संपूर्ण कार्यकारणीचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते दत्ताशेठ पाटील, अमोल पाटील, बाबुराव चव्हाण, विशाल गलांडे, इंदापूर नामदेव शिंपी समाजाचे उपाध्यक्ष मेघनाथ सातपुते, सचिव प्रमोद मिरजकर, खजिनदार संजय वंडकर, सदस्य सुधाकर क्षिरसागर, परमानंद कजबजे, वैभव पतंगे, देवेंद्र ढवळे, धनंजय ढवळे आदींसह नामदेव शिंपी समाजाचे महिला व पुरुष समाजबांधव तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगावात मयत महिलेच्या नातेवाईकांचा शोध सुरू

**माणगाव :** माणगावात जानेवारी महिन्यात सापडलेल्या अनोळखी मयत महिलेच्या नातेवाईकांचा माणगाव पोलीस शोध घेत आहेत.

माणगाव नगरपंचायत हद्दीतील ४ जानेवारी २०२३ रोजी सकाळी उतेखोल गावच्या हद्दीतील रायझिंग रेसिडेन्सीच्या पाठीमागील जंगल भागात एका अनोळखी मयत महिलेचा मृतदेह आढळला होता. या मयत अनोळखी महिलेच्या नातेवाईकांचा शोध अद्याप लागलेला नाही. अनोळखी मयत महिलेचे वर्णन अंगात गुलाबी ब्लाउज, चॉकलेटी परकर, लाल मण्यांची तुळशीमाळ, आकाशी काचेच्या बांगड्या असा आहे. महिलेला कोणी ओळखत असल्यास अथवा तिच्या नातेवाईकांनी माणगाव पोलीस ठाणे (०२१४०-२६३००५) वर संपर्क साधण्याचे आवाहन महिला पोलीस उपनिरीक्षक माणगाव अस्मिता पाटील यांनी केले आहे.

# नागोठणे उर्दू हायस्कूलमध्ये वह्यावाटप

**नागोठणे : बातमीदार**



गोर गरीब विध्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेत काही तरी मदत व्हावी या हेतूने रायगडचे कर्तव्यदक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री अदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने नागोठणे एजुकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूलच्या विध्यार्थ्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाईसाहेब टके यांच्या हस्ते वह्या वाटप करण्यात आले.

दरम्यान, वह्या वाटप संपूर्ण नागोठणे विभागातील शाळेमध्ये करण्यात येणार असुन या वह्या वाटपाचा प्रारंभ नागोठणे उर्दू हायस्कूल पासुन करण्यात आला असल्याची माहिती नागोठणेचे माजी सरपंच उर्दू हायस्कूलचे सेक्रेटरी लियाकत कडवेकर यांनी दिली.

वह्या वाटप कार्यक्रमाच्या वेळी दिलीपभाई टके, लियाकत कडवेकर, राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, नागोठणे ग्रा. पं. सदस्य अखलाक पानसरे, उर्दू हायस्कूलचे संचालक सागिर अधिकारी, प्रियदर्शनी संस्थेचे उपाध्यक्ष प्रथमेश काळे, नागोठणे केअर क्लब बॉईज फाउंडेशनचे अध्यक्ष उमेर सांगडे, सिद्धेश काळे, तात्या पोत्रिक, उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक अतिक अन्सारी, मुख्य शिक्षक लाडाजी बागवान, अनिस शेख आदींसह शिक्षक व विध्यार्थी उपस्थित होते.

# नांदगाव हायस्कूलमधील विद्यार्थ्यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन वसेऊल तालीम उर्दू ट्रस्ट रायगड व मेहरूनिसा अब्बाज फकीह इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिटयूट आयटीआय मजगाव यांच्या तर्फे श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव हायस्कूल मधील विद्यार्थी जिज्ञासा रुपेश रावजी व सुरभी प्रवीण कोतवाल या दोन्ही विद्यार्थीनीना ८८.८८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांच्या पालकांसह व त्यांचा आकर्षक भेटवस्तू व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभास मजगाव आटीआयतर्फे इर्शाद दखने हे स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी इर्शाद दखने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यास वेळच्या वेळी केल्यास व नियोजित वेळापत्रक बनवल्यास चांगले यश मिळाल्याशिवाय राहत नाही. आज जे मार्क विद्यार्थ्यांनी मिळवलेत यामध्ये त्यांचे शिक्षक यांचेसुद्धा महत्त्वाचे योगदान असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. त्यांनी इयत्ता दहावी नंतर असणाऱ्या कोर्सेचीसुद्धा माहिती दिली.

मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर, पर्यवेक्षक अर्चना खोत, राहील घलटे यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार योगेश पाटील यांनी मानले.




Medical Faculty

(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

**Dr. N .Y. Tasgaonkar Institute of Medical Science**

Sau. Vandana Tasgaonkar Health Care Complex, Kalyan Karjat Road, Opp. Bhivpuri Road Railway Station, Post-Koshane, Tal-Karjat, Dist-Raigad, MH-410 201,

Mail ID -dean.rhrc@tasgaonkartech.com Webside-www.nytims.in

Ph-9272188812/ 7875480705/ 8983621211 Fax No. 02224318823

**WANTED**

A) Applications are invited for filling up the following posts in the above said College/ Institute

| Sr. No. | Subject | Professor | Reader | Lecturer | Tutor |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ANATOMY | | | OPEN-1 | |
| 2 | PHYSIOLOGY | | | | |
| 3 | BIO-CHEMISTRY | | | | |
| 4 | PHARMACOLOGY | OPEN-1 | | | |
| 5 | PATHOLOGY | VJ-1 | | ST-1, OBC-1 | |
| | BLOOD BANK | | | | |
| 6 | MICROBIOLOGY | NTC-1 | | | |
| 7 | FORENSIC MEDICINE | OBC-1 | SC-1 | | |
| 8 | Community/ Medicine/ Preventive & Social Medicine | OPEN-1 | OPEN-1 | ST-1 | |
| | Epidemiologist-Cum-Asst. Prof. | | | | |
| | Statistician –cum-Tutor | | | | |
| | RHTC-MO cum Lecturer/ Asst. Prof. | | | | |
| | UHTC-MO cum Lecturer/ Asst. | | | | |
| 9 | GENERAL MEDICINE | | OPEN-1 | | |
| 10 | PAEDIATRICS | | | | |
| 11 | T.B. & RESPIRATORY DISEASES | | VJ-1 | | |
| 12 | V.D. & LEPROSY | | OBC-1 | | |
| 13 | PSYCHIATRY | | EWS-1 | | |
| 14 | GENERAL SURGERY | EWS-1 | OBC-1 | | |
| 15 | ORTHOPAEDICS | | ST-1 | | |
| 16 | OPTHALMOLOGY | | OBC-1 | | |
| 17 | OTO-RHINO-LARYNGOLOGY (ENT) | | OBC-1 | | |
| 18 | OBSTETRICS & GYNAECOLOGY | | | | |
| | Antenatal Medical Officer cum Asst. Professor | | | | |
| | Maternity and Child Welfare Officer cum Asst. Professor | | | | |
| 19 | ANAESTHESIOLOGY | | NTD-1 | SBC-1 | |
| 20 | RADIO-DIAGNOSIS | ST-1 | | | |
| 21 | DENTISTRY | | OPEN-1 | | |
| 22 | RADIOTHERAPY (Optional) | | | | |
| 23 | Emergency Medicine | | OPEN-1 | | |
| | Differently abled persons | | | | |

B) **Qualification & Experience :**

| Post(s) | Qualification & Experience |
|---|---|
| Professor | a) Recognized post graduate degree medical qualification in the concerned subject. b) As Associate Professor in the subject concerned for three years in recognized medical college. c) Four Research papers accepted/published in index/national journal as first/second author on cumulative basis. Out of these four research publications minimum two research publication must be published during the tenure of the Associate Professor. |
| Associate Professor/ Reader | a) Recognized post graduate degree medical qualification in the concerned subject. b) As Assistant Professor in the subject concerned for four years in recognized medical college. c) Two Research papers accepted/published in index/national journal as first/second author during the tenure of Assistant Professor. |
| Assistant Professor/ Lecturer | a) Recognized Post graduate degree in the concerned subject. b) Three years teaching experience in the subject in a recognized Medical College as Resident / Registrar / Demonstrator / Tutor |
| Tutor / Demonst. | a) M.B.B.S. qualification or M. Sc. (Medical Anatomy) in particular subject as specified by M.C.I. candidate possessing post graduate qualification in subject will be preferred. |

**C) General Notes:-**

1) Horizontal Reservation for Ladies / Sports etc. as per the state government circular / regulations and the differently abled persons reservation as per the government regulations / circular issued from time to time (Ref: Government letter GAD/1118/CR417/16 dated 28/12/2018, for differently abled persons GR dated 27/04/2011, 04/08/2011, 28/07/2014, 29/05/2019 and MEDD letter dated 30/06/2015)(if applicable).
The vertical reservation allotments vide Government Resolution and circular dated 29/05/2017, 25/07/2018, 05/12/2018, 19/12/2018, 07/01/2019, 12/02/2019, 16/02/2019, 18/02/2019, 04/07/2019, 05/03/2020, 11/03/2020 etc. (if applicable).
2) Candidates applying for reserve category post(s) should submit caste certificate & caste validity certificate and also recent non-creamy layer certificate, wherever applicable.
3) The benefits of reservation shall be admissible to the backward class / category candidates who are domiciled in the state of Maharashtra only (if applicable).
4) Age Limit & Educational Qualifications shall be considered up to last date of the application & experience shall be considered up to earlier day of the interview.
5) The decision taken by MUHS authorities regarding essential qualifications and experience shall be applicable, from time to time.
6) Qualified teachers above the age of 64 years will be considered for appointment of one – one year, as per respective Council's norms.
7) Pay Scale is as per rules.
8) Application along with attested copies of all relevant certificates must reach to the College on or before: 27/07/2023

**D) Other Notes : (College Level)**

Apply to the **Dean,** at **Dr. NY Tasgaonkar Institute of Medical Science At Diksal, Post-Koshane, Tal-Karjat, Dist- Raigad 410 201** on plain paper / prescribed format along with attested copies of certificates and experience certificates.

**Sd/-**

**Dean (Signature & College Seal)**

# दुषित पाण्यामुळे आजारांना निमंत्रण

## नवी मुंबईत गॅस्ट्रोच्या रुग्णांमध्ये वाढ; डेंग्यूचे २३ संशयित

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार गॅस्ट्रो, अतिसार, लेप्टोस्पायरोसीस तसेच किटकजन्य आजार मलेरिया, डेंग्यू आजार डोके वर काढू लागतात. नवी मुंबई शहरात एप्रिलपासून दूषित पाणीपुरवठ्याचे सत्र सुरू आहे. त्यामुळे यंदा गॅस्ट्रोच्या रुग्ण वाढत आहेत. जानेवारी ते आतापर्यंत एकुण १०१ रुग्ण आढळले असून जूनमध्ये २३ तर या महिन्यात आतापर्यंत नऊ रुग्ण आढळले आहेत.



ज्या भागात दुषीत पाणी पुरवठा होतो. जुनी पाईपलाईन गंजलेल्या पाईप लाईन पाण्याची गळती यातून जंतू संसर्ग पाण्यात येतात. पाणी दुषीत येते, ते पोटात गेल्यास गॅस्ट्रोची लागण होते, असे डॉक्टरांनी सांगितले आहे. नवी मुंबई शहरात एप्रिलपासून आठवड्यातुन दोन ते तीन वेळा दूषित पाणी पुरवठा होत आहे. एक दिवस पाणी न आल्याने त्याच्या पुढील दोन दिवस हिरवे गढूळ पाणी येते. त्यामुळे वारंवार दूषित पाणीपुरवठ्याने नागरिक हैराण झाले आहेत. शिवाय त्यामुळे साथीचे आजार देखील बळावत आहेत.

दूषित पाण्याने यावेळी गॅस्ट्रोच्या रुग्णात वाढ झाली आहे. गॅस्ट्रोच्या, अतिसार, हगवण या आजारांमध्ये ताप येणे, अतिसार, उलट्या होणे, जल शुष्कतेची लक्षणे हात पाय गार पडणे, त्वचा शुष्क पडणे ही लक्षणे आढळतात. जूनमध्ये गॅस्ट्रोचे २३ तर जुलैत आतापर्यंत ९ रुग्ण आढळले आहेत. जानेवारी ते आतापर्यंत डेंग्यूचे २८८ तर जुलैमध्ये २३ संशयित रुग्ण आढळले आहेत.

# नवी मुंबई मनपाच्या सर्वेक्षणात हजारो झोपडीधारक अपात्र

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईसह पुण्यासारख्या शहरातील २००० पर्यंतच्या मोफत तर त्यानंतर २०११ पर्यंत झोपडीधारकांना २.५ लाखात सदनिका उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, मात्र नवी मुंबई महापालिकेने वास्तव्याचे पुरावे असतानाही नवी मुंबईतील हजारो झोपडीधारकांना अपात्र ठरवले आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाच्या कारभारावर स्थानिकांत संतापाची लाट पसरली आहे.

नवी मुंबई महापालिकेने केलेल्या १ जानेवारी ९५ च्या झोपडपट्टी सर्वेक्षणानुसार संपुर्ण पालिका क्षेत्रात सूमारे ४१८०५ झोपडीधारक होते. त्यातील १९०८९ जणांना पात्र ठरवले आहे. पालिकेने २२७१६ झोपडीधारक अपात्र असल्याची नोंद केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आल्याने गेली ५० वर्षे नवी मुंबईत वास्तव्य करणारे झोपडीधारक धास्तावले आहेत. या सर्वेक्षणानंतरही आपण पात्र आहोत की अपात्र याची कल्पना झोपडीधारकांना नवी मुंबई मनपा प्रशासन देत नाही.

राज्य शासनाने मागील १ जानेवारी २००१ पूर्वीच्या अनधिकृत झोपड्या पात्र असल्याचे घोषित केले होते. त्यानुसार त्यांना सर्वे पावती देण्याची प्रक्रिया सुरू केली होती. त्यानंतर १ जानेवारी २०११ पर्यंतच्या पुरावे असणाऱ्या झोपडीधारकांना दोन लाख ५० हजार रुपये अनुदान देऊन घर देण्याचे आश्वासन दिले होते. तर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ मे २०२३ रोजी देशातील सर्व बेघर यांना जलमय सर्व सुविधा युक्त घर देण्याची घोषणा केली होती.

एकीकडे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व बेघर लोकांना घर देण्याचे घोषणा करतात तर दुसरीकडे नवी मुंबई महापालिका प्रशासन सुमारे ५० वर्षांपासून शहरात राहणाऱ्या २२७१६ झोपडीधारकांना अपात्र ठरवत आहे. यावर अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांन नवी मुंबई प्रशासनकडे गेल्यास आपण अपात्र का आहोत याचे कोणतेही कारण मिळत नाही.



पनवेल : येथील प्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत तसेच डॉ. रमेश पटेल, डॉ. लक्ष्मण आवटे, डॉ. मिलिंद घरत, डॉ. राजेश सकपाळ आदी उपस्थित होते.

# शाळा मैदानात खासगी वाहनांची पार्किंग

## विद्यार्थ्यांसह पालक त्रस्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे येथील माजी सरपंच अरुण सुतार प्राथमिक आणि माध्यमिक हायस्कूलच्या शाळेचे हक्काचे मैदान मुलांना सार्वजनिक मैदानी खेळ खेळण्यासाठी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

शाळेच्या मैदानाचा वापर स्थानिक नागरिक आपल्या खाजगी गाड्या पार्क करण्यासाठी वापरत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्ष शाळेतील हजारो विद्यार्थी मैदानाच्या खेळापासून वंचित राहत आहेत, अशी स्थिती आहे. या ठिकाणी भुयारी पार्किंग करावी वा समोरील जुन्या जलकुंभ ठिकाणी बहु मजली वाहन पार्किंग निर्माण करावे म्हणजे पार्किंग समस्या कायमस्वरूपी मार्गी लागेल, अशी मागणीदेखील माधुरी सुतार यांनी आयुक्तांना केली आहे.



नवी मुंबई महापालिका शिक्षण विभागाची स्व. माजी सरपंच अरुण सुतार शाळा क्रमांक १५ पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि शाळा क्रमांक १०१ ही माध्यमिक शाळा असून इथ सुमारे १,४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नवी मुंबई मनपा शाळेचे मोठे मैदान असून या मैदानाचा ताबा वर्षानुवर्ष स्थानिक नागरिकांच्या वाहनांनी घेतला आहे. ही वाहने दिवस रात्र या मैदानात पार्क करून ठेवलेली नागरिकांच्या निदर्शनास येते.

वाहनपार्किंग समस्या वर्षानुवर्ष असून याबाबत दरवर्षी नवी मुंबई मनपा कडे तक्रार करीत असून या बाबींवर ठोस निर्णय ना नवी मुंबई मनपा घेते ना शिक्षण विभाग घेते, असे माधुरी सुतार यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निदर्शनास आणले आहे. शाळेच्या मैदानावर भुयारी वाहन तळ निर्माण करावे व समोर असलेल्या जुन्या जलकुंभ ठिकाणी बहुमजली वाहन तळ निर्माण करावे, अशी मागणी आयुक्तांकडे सुतार यांनी केली आहे.

> **नवी मुंबई मनपा शिक्षण विभागाची स्व अरुण सुतार शाळा क्रमांक १५ आणि शाळा क्रमांक १०१ वरील खेळाच्या मैदानावरील खाजगी वाहन पार्किंग समस्या जुनीच आहे. या बाबत पालकांच्या अनेक तक्रारी आहेत. आम्ही आरटीओकडेही तक्रार केली आहे. वाहन चालक जुमानत नाहीत.**
>
> **-अरुणा यादव, शिक्षण अधिकारी, नवी मुंबई शिक्षण विभाग**

# कर्करोगमुक्त रायगड अभियानाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड मेडिकल असोसिएशन आणि मुंबई ऑन्कोकेअर सेंटर, खांदा कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोगमुक्त रायगड अभियान या संकल्पनेचा उदघाटन सोहळा बुधवारी (दि. १२) खांदा कॉलनी येथे वरिष्ठ कर्करोगतज्ञ डॉ. देवेंद्र पाल, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुणकुमार भगत, सेक्रेटरी डॉ. राजेश सकपाळ, पनवेलमधील वरिष्ठ सर्जन डॉ. रमेश पटेल व इतर रायगड मेडिकल असोसिएशनचे सभासद डॉक्टर यांच्या उपस्थितीत झाला.

या कार्यक्रमास खारघर ते पनवेल, उरण येथील नामवंत डॉक्टर यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. कर्करोगमुक्त रायगड अभियान या कार्यक्रमा अंतर्गत मुंबई ऑन्कोकेअर सेन्टर (एमओसी), संपूर्ण रायगड जिल्ह्यात कर्करोग निदान शिबीर आयोजित करणार आहेत. याचबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून बेसिक लाईफ सपोर्ट (बीएलएस) कार्यशाळा प्रशिक्षकाच्या माध्यमातून करणार आहेत.



कर्करोगमुक्त रायगड अभियान अंतर्गत रायगड मेडिकल असोसिएशन (आरएमए) अध्यक्ष डॉ. अरुणकुमार भगत यांनी कर्करोग (कॅन्सर) लक्षणे पोस्टर अनावरण केले. तसेच डॉ देवेंद्र पाल यांनी (कर्करोग तज्ज्ञ) दर मंगळवारी कर्करोग मोफत सल्ला मुंबई ऑन्कोकेअर सेंटर, खांदा कॉलनी येथे करण्याचे जाहीर केले. या कार्यक्रमाची सांगता डॉ. एस. व्ही. कुलकर्णी व डॉ. विनय शेलार यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली.

मंगळवार कर्करोग मोफत सल्ल्या अंतर्गत कोणालाही कर्करोग (कॅन्सर) बद्दल काही शंका असल्यास त्यांनी ७२०८८७०६५७ अथवा ८७७९७२९५३१ अथवा ९७६९९००३३१ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिव्यांग मुलांनी बनविले सीडबॉल

**नवी मुंबई : बातमीदार**

माझी वसुंधरा अभियानात दिव्यांगांचाही सहभाग असावा या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या ईटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सुविधा केंद्राच्या वतीने माता अमृतानंदमयी मठ, नेरुळ यांच्या सहयोगाने दिव्यांग मुलांसाठी सीडबॉल तयार करण्याच्या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ईटीसी केंद्र संचालक डॉ. मिताली संचेती यांच्या नियंत्रणाखाली आयोजित करण्यात आलेल्या सीडबॉल कार्यशाळेमध्ये दिव्यांग मुले काहीतरी वेगळे करायला मिळणार या उत्सुकतेने सहभागी झाली होती.

सीडबॉल बनविण्याकरिता जुने कपडे, हातरुमाल, प्रन अशा वस्तूंचा उपयोग करण्यात आला. कार्यशाळेमध्ये मुलांना बी रूजण्यासाठी योग्य मातीची निवड कशी करावी, त्यात गांडूळ खत, कोकोपीट व शेणखताचे किती प्रमाण असावे अशा विविध बाबींबाबत सविस्त्र माहिती देण्यात आली.



या वेळी लागवड योग्य ओलसर मातीचे बियांसहित गोळे, बॉल मुलांकडून बनवून घेण्यात आले. सीड बॉल बनविण्याकरिता वड, पिंपळ, जांभूळ, निंब, करंज अशा विविध देशी झाडांच्या बियांचा उपयोग करण्यात आला. या वेळी मुलांनी मातीच्या चिखलामध्ये बीज रोपणाचा आनंद घेतला. ईटीसी केंद्र संचालक डॉ. मिताली संचेती यांच्यासह ईटीसी केंद्रातील शैक्षणिक व्यवस्थापक दीपक नवगरे व सर्व शिक्षकांनी कार्यशाळा आयोजनात उत्साहाने सहभागी होत मुलांकडून सीडबॉल बनवून घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

# ‘स्वर संगम’चे काम प्रेरणादायी

## भगवान म्हात्रे यांचे प्रतिपादन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वर संगम ही नवी मुंबईतील कलावंतांची एक सांस्कृतिक संस्था असून या संस्थेने विशेषतः जिथं गरज अशा आदिवासी भागात दिवाळी भेट, अन्नदान, साडीचोळी वाटप, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्य वाटप, विविध स्पर्धांचे आयोजन, औषधे वाटप, अंध श्रद्धा निर्मूलनावर पथनाट्याचे आयोजन, चर्चासत्र असे अनेक उपक्रम राबविले असून स्वरसंगमचं हे काम सर्वांनाच प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे युवा नेते भगवान म्हात्रे यांनी फणसवाडी खारघर येथे केले.

स्वर संगम सांस्कृतिक संस्था संस्थेच्या वतीने फणसवाडी (खारघर) येथे काल क्रीडा व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी ग्रामदेवता मंदिर ट्रस्टचे माजी अध्यक्ष नारायण पाटील, सामाजिक कार्यकर्त्या मनिषा म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते अनिल भोईर, रुपेश भोईर, रामदास शेळके गुरुजी, स्वर संगमचे संस्थापक अध्यक्ष अमृत पाटील नेरुळकर, मुख्य सचिव रामचंद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.



स्वर संगम ही नवी मुंबईतील कलावंतांची एक सांस्कृतिक संस्था असून अमृत पाटील यांच्या पुढाकाराने या संस्थेनं केलेली रंजल्या - गांजल्यांची, उपेक्षितांची - दुर्लक्षितांची सेवा कौतुकास्पद असल्याचे या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायण पाटील यांनी सांगितले.

स्वर संगम ही आज तिसाव्या वर्षात पदार्पण करीत असून संस्थेचा हा शंभरावा कार्यक्रम असल्याचे उपक्रमाविषयी माहिती देताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमृत पाटील नेरूळकर यांनी सांगितले.

यावेळी मनिषा म्हात्रे, अनिल भोईर, रामदास शेळके गुरुजी आदींची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रूपेश भोईर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पद्माकर वैती, मिथुन खान, विशाल गायकवाड, अथर्व पाटील, संदीप भोईर यांनी विशेष मेहनत घेतली.

# झोपडीत घुसलेल्या अजगराची सुटका

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील एका झोपडपट्टीमधील झोपडीत घुसलेल्या अजगराची सर्पमित्रांनी सुखरूप सुटका करीत त्यास जंगलात सोडून दिले. या अजगराने दोन कोंबड्या खाऊन फस्त केल्या होत्या.

दुर्गामाता नगर झोपडपट्टी, सेक्टर ८ सीबीडी येथे एका झोपडीत एक मोठा साप वेटोळे मारून बसल्याची माहिती रात्री दीडच्या सुमारास पुनर्वसू फाउंडेशनला मिळाली. त्यानुसार सर्पमित्र स्वप्नील साटम व त्यांचे सहकारी मयुरेश नार्वेकर यांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली. ज्या घरात हा साप होता त्या घरस कुलूप लावून रहिवाशी बाहेर होते. सर्पमित्रांनी सावधानता बाळगत घरात प्रवेश केला. भले मोठे अजगर आले. एका कोंबडीला पकडून वेटोळे मारून बसल्याचे आढळून आले. स्वप्नील व मयुरेश यांनी प्रसंगावधान राखत अजगराला सुखरूप पकडले. त्याची लांबी मोजली असता तब्बल नऊ ते १० फूट लांबीचे हे अजगर होते.

सर्पमित्रांनी सीबीडी अग्निशमन दल, वनविभागाच्या मदतीने नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. त्यानंतर सर्पमित्रांनी घरातल्या लोकांना सापाविषयी माहिती देऊन तेथील लोकांच्या मनातील भीती दूर केली.



# ‘विद्याभवन’च्या १६ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी झाली निवड



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेतून पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील १६ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी अगोदरच जाहीर केली होती. नुकतेच शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे ऑनलाइन जाहीर करण्यात आले. मराठी माध्यमाच्या इयत्ता पाचवीतून विभूती गुंजाळ, अथर्व गायकवाड, वेदश्री राक्षे, आणि अथर्व पवार, इयत्ता आठवीतून ओम साळेकर यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. इंग्रजी माध्यमाच्या इ. पाचवीतून गार्गी गोळे, आर्या कदम, पलक सिंग, वैष्णवी कुलकर्णी, वैभव गुप्ता आणि वेदांती जाधव, इयत्ता आठवीतून अनघा शेळके, सोहम नात्ती, रवीतनया चव्हाण, सिद्धार्थ तिवारी आणि त्रिशा गुप्ता यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. विभूती गुंजाळ ही विद्यार्थिनी महाराष्ट्रातून सातवी आणि ठाणे जिल्ह्यातून पहिली आली.

पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष सुनील रेडेकर, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कोषाध्यक्ष आनंद कुलकर्णी, कुलसचिव अमोल जोशी संचालक राजेंद्र बोर्हाडे, दिनेश मिसाळ व सर्व संचालक मंडळ, माजी कार्याध्यक्ष प्रा.कृ.ना. शिरकांडे, मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक तसेच सर्व शिक्षक आणि पालकांनी शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# 'शासन आपल्या दारी'ला भरभरून प्रतिसाद

## कर्जतमध्ये राज्य शासनाच्या योजनेचा अनेकांना लाभ

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रत्येक जिल्ह्यात एकाच छताखाली किमान ७५ हजार लाभार्थ्यांना लाभ देण्याचा राज्य सरकारचा महासंकल्प शासन आपल्या दारी ही योजना राबवून अनेक गोरगरिबांचे विविध दाखले मिळत आहे. आता दहा हजारपेक्षा जास्त दाखले वाटप केले असल्याची माहिती कर्जतच्या तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी दिली.

शासन आपल्या दारी योजनेती योजनेतील कार्यक्रम: विविध शासकीय विभागांच्या योजना, रोजगार मेळावा, महाआरोग्य शिबिर, रक्तदान व अवयव दान शिबिर, चष्मेवाटप, दिव्यांगांना साहित्य वाटप, शिक्षण हक्क कायदा २५ टक्के विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रवेश, कृषी प्रदर्शन, महिलांना सखी कीट वाटप, स्वयंरोजगार व उद्यजकता मार्गदर्शन, शेतकरी ते ग्राहक थेट बाजार आणि बचत गटांचे स्टॉल, विविध सरकारी विभाग व महामंडाळाचे योजना माहिती स्टॉल, अंतर्गत गरजूंना वैयक्तिक लाभ देणे, नव मतदार नोंदणी केली जात असल्याचे तहसीलदार रसाळ यांनी सांगितले.




शासन आपल्या दारी ही योजना २३ मे ते ११ जूनपर्यंत नांदगाव, कडाव, कशेळे, पाथरज, चिंचवली, खांडपे, नेरळ, शेलू, कोल्हारे, कोल्हारे दहीवली या ठिकाणी शिबिरे आयोजित करून विविध दाखले देण्यात आले.

यामध्ये रेशनकार्ड नवीन बनविणे, नाव समाविष्ट करणे आणि कमी करणे असे ३०२ आलेले अर्ज, इपीक ४१५० केले, तर नवीन मतदार नोंदणी ६१० काम पूर्ण करून देण्याचे काम पुरवठा निरीक्षक अधिकारी तथा निवडणूक नायब तहसीलदार बी. टी. बुरसे यांनी केले आहे.

संजय गांधी, श्रावण बाळ योजना ११६ दाखल झाले असून त्याचे काम संजय गांधी योजनेचे नायब तहसीलदार आशा म्हात्रे हे कामकाज बघायचे. आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट १५५० दाखले, तर जेष्ठ नागरिक दाखला १०, जात प्रमाणपत्र ५३५, रहिवासी दाखला ३६७, उत्पन्नाचा दाखला २१०६, जन्म मृत्यू दाखले ४५, नॉन क्रिमीलर दाखले १४९, तात्पुरता रहिवासी दाखला ३१असे दाखले काढून देण्याचे काम नायब तहसीलदार सचिन राऊत यांनी केले आहे. अल्पभूधारक दाखले दोन, भूमिहीन दाखला एक, शेतकरी दाखले १०, डोंगरी दाखले तीन, ७/१२ प्रमाणित प्रत २१५, प्रकल्पग्रस्त दाखले, पी एम किसन दाखले करून देण्याची जबाबदारी नायब तहसीलदार सोपान बाचकर यांनी बजावली आहे.

# मुंबईकर गिर्यारोहक शरद कुलकर्णींचा अनोखा विक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**



जगातील सात खंडातील अवघड मानली जाणारी सात शिखरे सर करायची मोहीम आणि तेही वयाच्या पन्नाशीनंतर. मुंबईकर गिर्यारोहक शरद कुलकर्णी यांनी अफाट जिद्दीच्या जोरावर ही मोहीम यशस्वी करीत नवा विक्रम स्थापित केला. हा विक्रम रचत असताना या मोहिमेत एव्हरेस्ट शिखरावर मृत्यूमुखी पडलेल्या आपल्या पत्नी अंजली यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दुसऱ्यांदा एव्हरेस्ट सर करून त्याच जागी तिला श्रद्धांजली अर्पण करण्याचे धाडस त्यांनी केले. त्यांच्या या धाडसाचे आणि जिद्दीचे कौतुक होत आहे.

वयाच्या पन्नाशीनंतर शरद कुलकर्णी यांनी ऑस्ट्रेलियातील माउंट कोशियुस्को पत्नी अंजलीसह सर केले. त्यानंतर या दोघांनी आफ्रिकेतील किलीमांजरो शिखर सर केले. तिसरी मोहीम होती ती माउंट एव्हरेस्टची. या मोहिमेत अंजली यांचे माउंट एव्हरेस्टवरील हिलरी स्टेप येथे २२ मे २०१९ रोजी अपघाती मृत्यू झाला. या धक्क्यातून सावरून शरद कुलकर्णी यांनी अंजली यांना वचन दिल्याप्रमाणे उर्वरित चार खंडातील चार सर्वोच्च शिखरे सर केली व अनोखा विक्रम प्रस्थापित केला. यामध्ये अकांकागुहा (दक्षिण अमेरिका), देनाली (उत्तर अमेरिका), एलब्रस (युरोप), विन्सन (अंटार्टीका) या शिखरांचा समावेश होता. एव्हरेस्टसह सात शिखरे सर करणारा भारताचा सर्वांत वयस्क गिर्यारोहक होण्याचा नवा विक्रम शरद कुलकर्णी यांनी स्थापित केला. वयाची ६० वर्षे ६ महिने आणि तीन दिवस पूर्ण झाली असताना त्यांनी माऊंट एव्हरेस्ट सर केले.

# खालापूर प्रेस क्लबतर्फे शेतकऱ्यांचा सन्मान



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने तालुक्यात दोन आदर्श शेतकरी यांचा सन्मान तहसीलदार आयुब तांबोळी व अन्य मान्यवरांच्या हस्ते शेताच्या बांधावर करण्यात आला.

खालापूर तालुक्यातील माडप येथील प्रगतशील शेतकरी जयवंत धर्मा पाटील व खोपोली मुळगाव येथील प्रगतिशील शेतकरी सुरेश कोंडू शेंडे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या दोघांनी शेतीतून आर्थिक उन्नती साधली आहे. ते शेतीत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवतात. भाताच्या पिकासोबत नागली, वरी पिकेही घेतात, तर शेताच्या बांधावर व मोकळ्या जागेत विविध प्रकारची फळ झाडे, औषधी वनस्पती यांची लागवड करण्यात आली असून शेतीपूरक व्यवसाय कुकुटपालन, गाय, म्हशी व शेळी पालन करीत आहेत.

कमी जागेत मत्स्य तलाव बांधून मासे उत्पादन घेत आहेत. आपल्या जनावरांचा चारा आपल्याच शेतात तयार करतात तसेच शेती करताना सेंद्रिय खत निर्माण करून त्याचा वापर वाढीव उत्पादन घेण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांच्या उपक्रमांची दखल खालापूर प्रेस क्लब यांनी घेतली. याबद्दल तहसीलदार आयुब तांबोळी यांनी कौतुक करुन प्रशंसा केली.

कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी निंबाळकर, खालापूर तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, ग्रामविकास अधिकारी फोफेरकर, कृषी अधिकारी देशमुख, ज्येष्ठ पत्रकार भाई ओव्हाळ, अनिल पाटील यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

# इर्साळगडाच्या पायथ्याशी मिश्र झाडांची लागवड

**चौक : प्रतिनिधी**

कर्जत तालुका परीक्षेत्र विभागाचे वन क्षेत्रपाल समीर खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दुर्गम व प्रेक्षणीय स्थळ इर्साळगडाच्या पायथ्याशी मिश्र झाडांची लागवड वन अधिकारी जयवंत सुपे यांनी पर्यटकांच्या मदतीने केली.



माथेरान डोंगराच्या बरोबरीत असलेल्या इसाल गडाच्या पायथ्याशी व त्या परीसरात विविध प्रकारच्या वनौषधी वनस्पती झाडांची लागवड स्थानिक आदिवासी बांधव, येथे आलेले पावसाळी पर्यटक व वन संरक्षक यांच्या उपस्थितीत व हस्ते करण्यात आली. इर्साळगड येथे कायमस्वरुपी पर्यटक येत असतात. हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर येथे गिर्यारोहण व साहस करण्यासाठीं हे ठिकाण प्रसिद्ध आहे. येथे आलेल्या पर्यटकांनी एक झाड आपले म्हणून झाड लावून त्याच्या संगोपनची व संवर्धन करण्याची हमी घेतली. चौक मानीवली स. नं. ३९ हे राखीव वन क्षेत्र आहे. या ठिकाणी असणारा नंबरचीवाडी ते इसाळ गड हा रस्ता पावसाळ्यात वाढणाऱ्या झाडा झुडपच्या मुळे लक्षात येत नाही, त्यामुळे पर्यटक भरकटत जातात. वन कायद्याची अडचण असल्याने येथे रस्ता बनविता येत नाही. त्यामुळे अनेक पर्यटक रस्ता चुकतात, त्या अनुषंगाने या रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली. यामुळे पर्यटकांची संख्या जास्त होऊन येथे पर्यटन वाढेल असे आलेल्या पर्यटकांनी सांगितले.

या उपक्रमावेळी वन अधिकारी जयवंत सुपे, वन संरक्षक संदीप रक्टे, दिपक पाटील, रमेश झोरे, वर्षा केदारे, वनमजूर संजय वाघ यांच्यासह पर्यटक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेतकऱ्यांसाठी पीक विमा वरदान

कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेती ही बहुतांशी पावसावर अवलंबून आहे आणि पावसाचे प्रमाण हे अनियमित, अनिश्चित असल्यामुळे पीक उत्पादन हे निश्चित स्वरूपाचे नसते. त्यामुळे पिकांची उत्पादकता कमी राहते व त्यात अस्थिरता आढळून येते. कोकणात शेतकऱ्यांना दुष्काळ, पूर, कोरडे गवत, भूस्खलन, चक्रीवादळ, कीटक, रोग आणि इतर अशा नैसर्गिक आपत्तीचा सतत सामना करावा लागतो. केंद्र सरकारच्या कृषी विभागानेसुद्धा खरीप हंगामापूर्वी ही बाब अधोरेखित केली होती. पिकांच्या हंगामावेळी हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान, पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, पूर, शेती जलमय होणे, भूस्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, कीडरोग आदी कारणांमुळे हंगामाच्या अखेरीस उत्पन्नात येणारी घट. नैसर्गिक कारणांमुळे काढणीपश्चात शेतीमालाचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या कृषी विभागाने राबविलेली इ पिक विमा योजना आता अधिक प्रभावी आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे.



राज्यात एक रुपयात पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय युती शासनाने घेतला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषित केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पीक विमा काढता येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://pmfby.gov.in या संकेतस्थळावर भेट द्या. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी असून योजना ऐच्छीक स्वरुपाची आहे. खातेदाराव्यतिरीक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरीसुद्धा या योजनेत सहभागी होऊ शकतात. या योजनेत नैसर्गिक आपत्ती, किड आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळते. ही योजना राबविण्यासाठी राज्यातील जिल्ह्यांचे १२ समूह करण्यात आले आहेत. या जिल्ह्यांच्या प्रत्येक समूहासाठी एक विमा कंपनी नेमण्यात आलेली आहे. या वर्षापासून या योजनेमध्ये एक महत्त्वाचा बदल करण्यात आलेला आहे. तो म्हणजे प्रधानमंत्री पीक विमा योजना ही या वर्षी कप अँड कॅप मॉडेल (८०:११०) नुसार राबविण्यात येणार आहे. यामध्ये एकूण जमा विमा हप्त्याच्या २० टक्के पेक्षा जास्त रक्कम विमा कंपन्यांना स्वतःकडे ठेवता येणार नाही. शेतकऱ्यांची नुकसानभरपाई दिल्यानंतर उरलेली २० टक्केपेक्षा जास्तीची रक्कम विमा कंपनी राज्य शासनाला परत करेल तसेच विमा कंपनी एका वर्षामध्ये जिल्हा समुहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेच्या ११० टक्केपर्यंतचेच दायित्व स्वीकारणार आहे. त्यापेक्षा जास्तीचा भार राज्य शासन स्वीकारणार आहे. म्हणजे विमा कंपनीकडे जमा विमा हप्त्याच्या जास्तीत जास्त ११० टक्केपर्यंत नुकसानभरपाई शेतकऱ्यांना देईल. त्यापेक्षा जास्त असणारी नुकसानभरपाईची रक्कम राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येईल.

उदाहरणार्थ १) विमा कंपनीकडे एका वर्षामध्ये शेतकऱ्यांनी भरलेल्या विमा हप्त्याची रक्कम १०० कोटी रुपये आहे. आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले व नुकसान भरपाईची रक्कम ७५ कोटी असेल तर ७५ कोटी रुपये विमा कंपनीमार्फत शेतकऱ्यांना देण्यात येतील. २) कंपनी स्वतःकडे २० कोटी रुपये ठेवेल आणि उरलेले पाच कोटी रुपये राज्य शासनाला परत करेल. ३) विमा कंपनीकडे एका वर्षामध्ये शेतकऱ्यांनी भरलेल्या विमा हप्त्याची रक्कम १०० कोटी रुपये आहे आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले व नुकसानभरपाईची रक्कम ९५ कोटी असेल, तर ९५ कोटी रुपये विमा कंपनीमार्फत शेतकऱ्यांना देण्यात येतील. कंपनी स्वतःकडे पाच कोटी रुपये ठेवेल.

या योजनेसाठी केंद्र सरकार कोरडवाहू क्षेत्रासाठी विमा रकमेच्या ३०, तर बागायती जिल्ह्यतील पिकांना विमा रकमेच्या २५ टक्के मर्यादेत आपला हिस्सा भरणार आहे. उर्वरित रक्कम राज्य सरकारला भरावयाची आहे. आता त्यात शेतकरी हिश्श्याचाही समावेश होणार आहे.

खरीप हंगामातील पिकांना पीक विमा घेण्यासाठी ३१ जुलैपर्यंत पीक विमा संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. रब्बी हंगामातील पिकांना पीक विमा घेण्यासाठी ३० नोव्हेंबपर्यंत संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे. सात-बारा उताऱ्यावर शेतकऱ्यांचे नाव नसल्यास, बोगस भाडेकरार किंवा बोगसपणे कुळाने शेती करीत असल्याचे दाखवून बोगस पीक विमा काढल्यास फौजदारी कारवाई केली जाणार आहे. २०२३ ते रब्बी हंगाम २०२५-२६ या तीन वर्षांकरिता सर्व अधिसूचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के निश्चित करण्यात आला आहे. तृणधान्य व कडधान्य पिकांसाठी खरीप हंगामात भात, खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी, मूग, उडीद, तूर आणि मका. रब्बी हंगामात गहू, जिरायती रब्बी ज्वारी, हरभरा, उन्हाळी भात. गळीत धान्यांसाठी खरिपात भुईमूग, कारळे, तीळ, सूर्यफूल, सोयाबीन. रब्बी हंगामात उन्हाळी भुईमूग. नगदी पिकांसाठी खरीप हंगामात कापूस, खरीप कांदा. रब्बी हंगामात रब्बी कांदा या पिकासाठी विमा योजना आहे. ई-पीक पाहणीत नोंदविलेले क्षेत्र आणि प्रत्यक्षातील क्षेत्र यांत तफावत आढळल्यास ई-पीक पाहणीतील क्षेत्र गृहीत धरले जाणार आहे.

शासनाने ही योजना लागू करण्यासाठी विमा कंपन्यांकडून अर्ज मागविले होते. राज्य सरकारने नऊ कंपन्यांची निवड करून योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक विमा कंपन्यांना जिल्हे नेमून दिले आहेत. त्या कंपन्या आणि त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे... नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि. क्षेत्रीय कार्यालय, दुसरा मजला, काकडे बीझ, आयकॉन,ई स्क्वेअर जवळ,गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे-४११०१६, टोल फ्री क्र. १८०० २३३ ७४१४, ईमेल- uiicpmfby2023@uiic.co.in

औरंगाबाद, भंडारा, पालघर, रायगड या जिल्ह्यांसाठी चोलामंडलम एम एस जनरल इन्शुरन्स कं. लि., वेलस्ली कोर्ट, ३ रा मजला, १५-बी, डॉ. आंबेडकर रोड, इचथ शो रुम च्या वर, कैम्प, पुणे-४११००१, टोल फ्री क्र.- १८०० २०८ ९२००, ईमेल- customercare@cholams.murugappa.com

नगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा या जिल्ह्यांसाठी ओरिएंटल इन्शुरन्स कं. लि.,मेफ़ेअर टॉवर्स,पाहिला मजला,पुणे-मुंबई रोड,वाकडेवाडी, पुणे-४११००५, टोल फ्री क्र. १८०० ११ ८४८५, ईमेल- pmfby.16000@orientalinsurance.co.in

परभणी, वर्धा, नागपूर या जिल्हयांसाठी आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कं. लि., माणिकचंद आयकॉन, ३ रा मजला, प्लॉट नं. २४६, सी विंग, बंडगार्डन पुणे-४११००१, टोल फ्री क्र.- १८०० १०३ ७७१२, ई मेल- customersupportba@icicilombard.com

जालना, गोंदिया, कोल्हापूर या जिल्हयांसाठी युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कं.लि., १०३, पहिला मजला, आकृती स्टार, चखऊ सेंट्रल रोड, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००९३, टोल फ्री क्र. १८०० २०० ५१४२/१८०० २०० ४०३०, ईमेल- contactus@universalsompo.com

वाशिम, बुलडाणा, सांगली. बीड, नंदुरबार या जिल्ह्यांसाठी भारतीय कृषी विमा कंपनी, मुंबई क्षेत्रीय कार्यालय, स्टॉक एक्सेचेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रीट, फ़ोर्ट, मुंबई-४०००२३, टोल फ्री क्र.- १८०० ४१९ ५००४, ईमेल- pikvima@aicofindia.com

हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, उस्मानाबाद या जिल्ह्यांसाठी एचडीएफसी इर्गो जनरल इन्शुरन्स कं. लि., डी-३०१, तिसरा मजला,इस्टर्न बिझीनेस डिस्ट्रिक्ट (मैग्नेट मॉल) लाल बहादूर शास्त्री मार्ग, भांडुप (प.) मुंबई-४०००७८, टोल फ्री क्र.- १८०० २६६ ०७००, ईमेल- pmfby.maharashtra@hdfcergo.com

यवतमाळ, अमरावती, गडचिरोली या जिल्ह्यांसाठी रिलायन्स जनरल इन्शुरन्स कं. लि., पाचवा मजला, विरवानी इंडस्ट्रीयल इस्टेट च्या पुढे, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव पुर्व, मुंबई-४०००६३, टोल फ्री क्र.- १८०० १०२ ४०८८, ईमेल-rgicl.maharashtraagri@relianceada.com

लातूर जिल्ह्यासाठी एसबीआय जनरल इन्शुरन्स कं.लि., के.डी.प्लाझा,पाहिला मजला,२८९/६-७, नेहरु रोड,सेव्हन लव हॉटेल जवळ,स्वारगेट पुणे-४११०४२, टोल फ्री क्र.- १८०० २०९ ११११, ईमेल- pmfby.mh@sbigeneral.in/pmfby.sbig@sbigeneral.in

या योजनेमध्ये पाच प्रकारे पिकांचे नुकसान झाले, तर नुकसानभरपाई मिळते- अ) हवामान घटकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान- ब) हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत पिकांचे झालेले नुकसान क) हंगामाच्या अखेरीस सरासरी उत्पन्नाच्या आधारे नुकसान भरपाई निश्चीत करणे). ड) स्थानिक नैसर्गिक आपत्तिमुळे होणारे नुकसान-(वैयक्तीक स्तरावर) इ) नैसर्गिक कारणामुळे पिकांचे होणारे काढणीपश्चात नुकसान ( वैयक्तीक स्तरावर). उत्पादनातील तोटा निश्चित करण्याच्या उद्देशाने या योजनेसाठी अधिसूचित केलेल्या भागातील अधिसूचित पिकांवर पीक कापणी प्रयोग घेण्याची योजना कोकणातील जिल्ह्यात मान्य करण्यात आली आहे. उत्पन्नाची आकडेवारी जर कमी झाली असेल तर शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नातील तूट सोसावी लागली तर असे दावे शेतकऱ्यांना दिले गेल्यास त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. पिकांची पूर्व पेरणी, काढणी आणि काढणीनंतरच्या जोखमीसह पीक चकातील सर्व टप्प्यांसाठी विमा संरक्षण या योजनेत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेतील सर्व उत्पादने कृषी विभागाने मंजूर केली आहेत. कोकणातील शेतकरी आपापल्या जिल्ह्यातील संबंधित बँकांमध्ये, सामान्य सेवा केंद्रांकडे (सीएससी) संपर्क साधून या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेंतर्गत सहभागी होण्याची अंतिम तारीख ३१ जुलैपर्यंत असून सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

**-प्रवीण डोंगरदिवे, उपसंपादक,**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

# अश्विनच्या फिरकीने विंडीज गारद

## टीम इंडियाचा डाव आणि १४१ धावांनी विजय

**डॉमिनिका : वृत्तसंस्था**

दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा एक डाव आणि १४१ धावांनी पराभव केला. या विजयासह टीम इंडियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. विंडीजने नाणेफेक जिंकून पहिल्या डावात १५० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात पाच विकेट्स गमावत ४२९ धावा केल्याने टीम इंडियाला २७१ धावांची आघाडी मिळाली. यजमानांचा संघ दुसऱ्या डावात १३० धावांत गारद झाला आणि टीम इंडियाने सामना जिंकला.

रविचंद्रन अश्विनने अप्रतिम गोलंदाजी करीत वेस्ट इंडिजचा संघ १३० धावांत गुंडाळला.



पहिल्या डावात पाच विकेट्स घेतल्यानंतर अश्विनने दुसऱ्या डावात तब्बल सात विकेट्स घेतले. दुसऱ्या डावात विंडीजचा एकही फलंदाज क्रीझवर टिकू शकला नाही. त्यांच्याकडून अलिक नाथनागेने सर्वाधिक २८ धावा केल्या. भारताकडून अश्विनशिवाय रवींद्र जडेजाने दोन विकेट्स घेत मोलाची साथ दिली. मोहम्मद सिराजला पहिला ब्रेकथ्रू मिळाला.

तत्पूर्वी यशस्वी जैस्वाल, कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट कोहली यांनी भारतासाठी शानदार खेळी खेळली. यशस्वीने १७१ धावा केल्या. ही त्याची पदार्पणाची कसोटी होती. त्याचवेळी कर्णधार रोहितने १०४ धावांची खेळी केली. विराट कोहली ७६ धावा करून बाद झाला. विंडीजजकडून केमार रोच, अल्झारी जोसेफ, रहकीम कॉर्नवॉल, जोमेल वॅरिकन आणि ॲलिक अथानेज यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

तिसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात भारतीय संघाचा डाव घोषित झाला तेव्हा दिवसाचा खेळ संपण्यास जवळपास ५० षटके शिल्लक होती. यानंतर आपल्या फिरकीची जादू दाखवत अश्विनला विंडीज संघाचा दुसरा डाव गुंडाळण्यास जास्त वेळ लागला नाही. ५८ धावसंख्येपर्यंत वेस्ट इंडिजचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. यानंतर संपूर्ण संघ १३० धावांवर बाद झाला. अश्विनने कारकिर्दीत ३४व्यांदा एका डावात पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आणि दोन्ही डावांत मिळून आठव्यांदा सामन्यात १० विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. या सामन्यात १७१ धावांच्या खेळीसाठी यशस्वीला सामनावीराचा किताब देण्यात आला आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघ जाहीर

## पुरुष संघाची ऋतुराज गायकवाडकडे धुरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय पुरुष क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया प्रथमच आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेट स्पर्धा २८ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत टी-२० स्वरूपात होणार आहे. या स्पर्धेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाचे कर्णधारपद ऋतुराज गायकवाडकडे असणार आहे. युवा खेळाडूंना संघात स्थान मिळाले आहे. रिंकू सिंग, प्रभसिमरन सिंग आणि जितेश शर्मा हे स्टार खेळाडू संघात आहेत. या तिन्ही खेळाडूंनी आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी केली होती.

आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेट खेळाचा सहभाग असण्याची ही तिसरी वेळ आहे. यापूर्वी २०१० आणि २०१४मध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता, मात्र भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष किंवा महिला संघ कधीच पाठवले नाहीत.

**संघ** : ऋतुराज गायकवाड (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, राहुल त्रिपाठी, तिलक वर्मा, रिंकू सिंग, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद, रवी बिश्नोई, आवेश खान, अर्शदीप सिंग, मुकेश कुमार, शिवम मावी, शिवम दुबे, प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक); राखीव खेळाडू यश ठाकूर, साई किशोर, व्यंकटेश अय्यर, दीपक हुडा, साई सुदर्शन.

### हरमनप्रीत करणार महिलांचे नेतृत्व

एशियाडमध्ये आपले आव्हान सादर करणार आहे. स्मृती मंधाना उपकर्णधार असेल. महिला क्रिकेटचे सामने १९ ते २८ सप्टेंबरदरम्यान होणार आहेत.



**संघ** : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), शफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स, दीप्ती शर्मा, ऋचा घोष (यष्टीरक्षक), अमनजोत कौर, देविका वैद्य, अंजली सरवानी, तीतस साधू, राजेश्वरी गायकवाड, मिन्नू मनी, कानू मणी, उमा छेत्री (यष्टीरक्षक), अनुषा बरेडी; राखीव खेळाडू हरलीन देओल, काशवी गौतम, स्नेह राणा, सायका इशाक, पूजा वस्त्राकर.

### श्री शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा

# वेंगसरकर, वाड आणि सुमारीवाला यांना जीवनगौरव



**पुणे : प्रतिनिधी**

श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारांची राज्य सरकारच्या वतीने घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये बॅडमिंटन संघटक श्रीकांत वाड, भारताचे माजी क्रिकेट कर्णधार दिलीप वेंगसरकर आणि ॲथलेटिक्स संघटक आदिल सुमारीवाला यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

तीन वर्षांच्या (२०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२) या पुरस्कारांची घोषणा (माजी) क्रीडामंत्री गिरीश महाजन यांनी मुंबईत केली. जीवनगौरव (३), क्रीडा मार्गदर्शक (१३), जिजामाता (१), खेळाडू (८१), साहसी प्रकार (५) आणि दिव्यांग खेळाडू (१४) असे एकूण ११७ पुरस्कार या तीन वर्षांसाठी देण्यात आले आहेत.

**क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता पुरस्कार**

२०१९-२०२० : डॉ. आदित्य जोशी (जिम्नॅस्टिक), शिरीन गोडबोले (खो-खो), संजय भोसकर (दिव्यांग खेळासाठी), प्रशांत चव्हाण, प्रताप शेट्टी (कबड्डी), अमरसिंह निंबाळकर (कुस्ती), दर्शना पंडित (सॉफ्टबॉल); २०२०-२१ : संजोग ढोले (जिम्नॅस्टिक), राहुल राणे (स्केटिंग), डॉ. अभिजित इंगोले (सॉफ्टबॉल), विनय साबळे (दिव्यांग खेळासाठी); २०२१-२०२२ : सिद्धार्थ कदम (जिम्नॅस्टिक), चंद्रकांत इलग (तिरंदाजी), किशोर चौधरी (सॉफ्टबॉल).

**दिव्यांग खेळाडू**

२०१९-२० : योगेश्वर घाटबांधे, भाग्यश्री माझिरे (ॲथलेटिक्स), मीन बहादूर थापा (व्हिलचेअर बास्केटबॉल), आरती पाटील (बॅडमिंटन), मृणाली पांडे (बुद्धिबळ); २०२०-२१ : दीपक पाटील, वैष्णवी जगताप (जलतरण), सुरेश कार्की (व्हिलचेअर बास्केटबॉल), मिताली गायकवाड (तिरंदाजी); २०२१-२२ : प्रणव देसाई, आकुताई उलभगत (ॲथलेटिक्स), अनिल काची (व्हिलचेअर बास्केटबॉल), अनुराधा साळुंकी (व्हिलचेअर तलवारबाजी), भाग्यश्री जाधव (ॲथलेटिक्स).

**साहसी पुरस्कार**

२०१९-२० : सागर कांबळे (जल), कौस्तुभ राडकर (जमीन); २०२०-२१ : कृष्ण प्रकाश (जमीन), केवल कक्का (थेट पुरस्कार); २०२१-२२ : जितेंद्र गवारे (जमीन).

**क्रीडा पुरस्कार खेळाडू**

२०१९-२० : स्नेहल मांढरे (तिरंदाजी), पारस पाटील, अंकिता गोसावी (ॲथलेटिक्स), विजय न्हावी, शीतल शिंदे (आट्यापाट्या), तन्वी लाड (बॅडमिंटन), सौरभ लेणेकर (बॉक्सिंग), प्रणिता सोमण (सायकलिंग), जय शर्मा (तलवारबाजी), सायली जाधव (कबड्डी), सागर नागरे (कनोइंग-कयाकिंग), प्रतीक वाईकर, आरती कांबळे (खो-खो), दीपक शिंदे, प्रतीक्षा मोरे (मल्लखांब), नाजुका घारे (पॉवरलिफ्टिंग), भक्ती खामकर (नेमबाजी), अरहंत जोशी, श्रुतिका सरोदे (स्केटिंग), अभिजित फिरके, हर्षदा कासार (सॉफ्टबॉल), सिद्धी मणेरीकर (स्पोर्ट्स क्लाइम्बिंग), मिहीर आंब्रे, साध्वी धुरी (जलतरण), मेघाली रेडकर (डायव्हिंग), अश्विनी मळगे (वेटलिफ्टिंग), सोनबा गोंगाणे, सोनाली तोडकर (कुस्ती).

२०२०-२१ : विशाल फिरके, शीतल ओव्हाळ (आट्यापाट्या), यशिका शिंदे (नेमबाजी), स्वप्नाली वायदंडे (सॉफ्टबॉल), रेश्मा पुणेकर (बेसबॉल), मिताली वाणी (वुशू), सुर्या थट्टू, प्रियांका कारंडे (सायकलिंग), अजय सावंत (अश्वारोहण), निलेश साळुंके, मीनल जाधव (कबड्डी), अक्षय भांगरे, प्रियंका भोपी (खो-खो), अथर्व कुलकर्णी, आदिती धांडे (स्केटिंग), सिद्धेश पांडे (टेटे), श्रेया बोर्डवेकर (पॉवरलिफ्टिंग), अनिल मुंढे (कॅरम), ऋतुजा तळेगावकर (जलतरण), सुरज कोकाटे, कोमल गोळे (कुस्ती).

२०२१-२०२२ : मयुर रोकडे, मोनाली जाधव (तिरंदाजी), सर्वेश कुशारे (ॲथलेटिक्स), अजित बुरे, वैष्णवी तुमसरे (आट्यापाट्या), मालविका बनसोड (बॅडमिंटन), हरिवंश टावरी (बॉक्सिंग), अक्षय आव्हाड, मंजुषा पगार (दोघे बेसबॉल), राजेश इरले (शरीरसौष्ठव), देवेंद्र सुर्वे (कनॉइंग-कयाकिंग), संकल्प गुप्ता (बुद्धिबळ), मयुरी लुटे (सायकलिंग), अभय शिंदे, वैदेही लोहिया (तलवारबाजी), अर्जुन कढे (टेनिस), ऋग्वेद जोशी (जिम्नॅस्टिक्स-ॲरोबिक्स), अक्षय गणपुले, अपेक्षा सुतार (खो-खो), साहिल उतेकर, सोनल सावंत (पॉवरलिफ्टिंग), नीलेश धोंडगे (रोईंग), भरत चव्हाण (रग्बी), अभिज्ञा पाटील (नेमबाजी), यश चिनावले, कस्तुरी ताम्हणकर (स्केटिंग), सुमेध तळवेलकर (सॉफ्टबॉल), ऋतिक मारणे (स्पोर्टस क्लाइम्बिग), ज्योती पाटील (जलतरण), संकेत सरगर (वेटलिफ्टिंग), हर्षवर्धन सदगीर, स्वाती शिंदे (कुस्ती).

## विम्बल्डन टेनिस स्पर्धा; जोकोव्हिच अंतिम फेरीत

**विम्बल्डन : वृत्तसंस्था**



सर्बियाच्या दुसऱ्या मानांकित नोव्हाक जोकोव्हिचने विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने ग्रँडस्लॅम स्पर्धेची ३५व्यांदा अंतिम फेरी गाठली असून अशी कामगिरी करणारा तो पहिला पुरुष टेनिसपटू ठरला आहे.

पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात २३ ग्रँडस्लॅम विजेत्या जोकोव्हिचने इटलीच्या यानेक सिन्नेरला ६-३, ६-४, ७-६ (७-४) असे सरळ सेटमध्ये पराभूत केले आणि आठव्यांदा विम्बल्डनचे जेतेपद मिळवण्याकडे कूच केली. जोकोव्हिचने या वर्षी झालेल्या ऑस्ट्रेलियन आणि फ्रेंच खुल्या स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे. या स्पर्धेत जेतेपद पटकावल्यास त्याचे हे हंगामातील सलग तिसरे जेतेपद ठरेल.

# थाय बॉक्सिंग स्पर्धेत पेणच्या खेळाडूंचे सुयश



**पेण : प्रतिनिधी**

रायगड आणि पनवेल सिटी थाय बॉक्सिंग असोसिएशन यांच्या वतीने कामोठे येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत पेणच्या टीमने तृतीय क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकाविली. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विजयी सर्व स्पर्धेकांची छत्रपती संभाजी नगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थाय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात स्पर्धा झाली. या स्पर्धेत मुलांमध्ये आयु अमोल नवाळे, मयंक परेश ठाकूर, अर्णव नितेश घरत, भावेश परशुराम पाटील, संस्कार संतोष शिर्के, प्रेम प्रवीण म्हात्रे, स्मित श्रीकांत म्हात्रे, श्रेयश माळी, संस्कार संतोष यादव यांनी सुवर्ण; स्वराज मिलन म्हात्रे, अनुराज महेंद्र म्हात्रे, शिवम मोरेश्वर पाटील यांनी रौप्य; तर हर्ष धर्मवीर प्रजापती याने कांस्यपदक जिंकले. मुलींमध्ये सौम्या संतोष गोळे, पूर्वा विश्वनाथ मोरे, रितुल रवींद्र म्हात्रे यांनी सुवर्ण; तर सलोनी चंद्रशेखर सावंत व विधी सुभाष दापसे यांनी कांस्यपदक मिळविले. यशस्वी विद्यार्थी रवींद्र म्हात्रे, प्रथमेश मोकल, विनायक पाटील व आयुष रसाळ यांच्याकडे थाय-बॉक्सिंगचे प्रशिक्षण घेत आहेत.

स्पर्धेचे बक्षीस वितरण महाराष्ट्र थायबॉक्सिंगचे चेअरमन डॉ. मंदार पनवेलकर यांच्या हस्ते झाले. या संपूर्ण स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र थाय बॉक्सिंगचे सचिव सागर कोळी, रायगड जिल्हा अध्यक्ष निलेश भोसले, पनवेल सिटीचे अध्यक्ष प्रशांत घांगुर्डे यांनी केले होते. स्पर्धेस संजय पाटील, प्रतीक करांडे, चिंतामणी मोकल, सिद्धेश कदम, आदेश शेपुंडे, निलेश ओव्हाळ उपस्थित होते.

## यशस्वीचे द्विशतक हुकले, पण अनेकांना टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा युवा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालचे वेस्ट इंडिजविरुद्धच्या पदार्पणाच्या कसोटी सामन्यात द्विशतक हुकले. या सामन्यात पहिल्या डावात त्याने शानदार फलंदाजी करीत दीडशतक पूर्ण केले. त्यानंतर तो १७१ धावांवर बाद झाला. तो ऐतिहासिक कामगिरी करण्यास फक्त २९ धावांनी मुकला. त्याने जर अजून २९ धावा केल्या असत्या, तर तो भारतासाठी पदार्पणात द्विशतक झळकावणारा फलंदाज ठरला असता. असे असले तरी या खेळीतही त्याने विक्रम केले आहेत.

यशस्वीला द्विशतक झळकावता आले नाही, पण तो परदेशी भूमीवर पदार्पणाच्या कसोटी सामन्यात भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. त्याचबरोबर तो भारतासाठी पदार्पणाच्या कसोटी सामन्यात तिसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. या सामन्यात यशस्वी जैस्वालने ३८७ चेंडूंचा सामना करीत १७१ धावांची खेळी केली.

गुंडप्पा विश्वनाथचा विक्रम मोडून यशस्वी जैस्वाल कसोटी सामन्यात पदार्पणात भारतासाठी तिसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. गुंडप्पा विश्वनाथने १९६९मध्ये पदार्पणाच्या कसोटी सामन्यात १३७ धावा केल्या होत्या, पण आता यशस्वीने १७१ धावा करीत त्याला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.

# नवी मुंबई मनपा जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने नेरूळ सेक्टर १९ येथील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणामधील आंतरराष्ट्रीय फुटबॉल मैदानात जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचा प्रारंभ झाला. या वेळी उपायुक्त मंगला माळवे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

उद्घाटन समारंभास क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, अभिलाषा म्हात्रे-पाटील, जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा समिती सदस्य धनंजय वनमाळी आदी मान्यवर तसेच विविध शाळांचे क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक व ठाणे जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे पंच उपस्थित होते.

या स्पर्धेत मनपा क्षेत्रातील २३० हून अधिक शाळांमधून ३५ हजारहून अधिक खेळाडू उत्साहाने सहभागी होत असून त्यामध्ये शासन मान्यताप्राप्त ४९ क्रीडा प्रकारांच्या खेळाडूंचा समावेश आहे. यामध्ये इनडोअर आणि आऊटडोअर अशा दोन्ही खेळाच्या वैयक्तिक व सांघिक प्रकारातील स्पर्धांचे आयोजन केले जाते.




जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेच्या शुभारंभाचा फुटबॉलचा सामना सेंट झेव्हियर्स नेरूळ आणि व्हेलॉन हाईट्स वाशी या दोन संघात खेळविण्यात आला. यामध्ये सेंट झेव्हियर्स संघाने व्हेलॉन हाईट्स संघावर १-० अशी मात करीत सामना जिंकला.

## जस्टिन लँगर लखनऊ संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएल फ्रँचायझी लखनऊ सुपर जायंट्सने (एलएसजी) एक मोठी घोषणा केली आहे. एलएसजीने जस्टिन लँगरला आपल्या संघाचा नवीन मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले आहे. याआधी अँडी फ्लॉवर सुरुवातीच्या दोन हंगामात संघाच्या मुख्य प्रशिक्षकाच्या भूमिकेत होता.

अँडी फ्लॉवरचा लखनऊ फ्रँचायझीसोबत दोन वर्षांचा करार होता, जो या वर्षीच्या हंगामाच्या शेवटी संपला.


कै. महादेव काळू ठाकूर

यांना शनिवार, दि. ८/७/२०२३ रोजी वयाच्या ८३व्या वर्षी देवाज्ञा झाली.

दशक्रिया विधी

सोमवार, दि. १७/७/२०२३ रोजी श्री सिद्धेश्वर मंदिर देवस्थान, गुळसुंदे येथे होणार आहे.

उत्तरकार्य

गुरुवार, दि. २०/७/२०२३ रोजी राहत्या घरी नवीन वसाहत तारा येथे होईल.

*सहवास जरी सुटला तरी स्मृती सुगंध देत राहील,*
*आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील..*

शोकाकुल
समस्त ठाकूर परिवार

टिप - दुखवटे स्वीकारले जाणार नाहीत.



Visit Hirwal Education Trust College for all choices...before searching it elsewhere...

HIRWAL EDUCATION TRUST

ADMISSIONS OPEN 2023 - 2024

*Degree Colleges Affiliated to University of Mumbai*

COLLEGE OF COMPUTER SCIENCE & INFORMATION TECHNOLOGY
(NAAC Accredited with 'B' Grade)

HIRWAL RATRA MAHAVIDYALAYA

- B.Sc.IT
- B.Sc.
- B.Sc.CS
- B.Com
- B.M.S.

JUNIOR COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE
English Medium
Science | Commerce

Our USP
- Quality Education
- Qualified Efficient Staff
- Personal Counseling
- Industrial Linkage
- Campus Placement Assistance
- Skill Development Courses
- Scholarship Facility

- VISIT US: Website: www.hirwaleducationtrust.com
- Email : hirwaleducationtrust@rediffmail.com
- Address : Hirwal Education Trust Campus, Mumbai-Goa Highway, Behind Dharia Petrol Pump, Mahad-Raigad.
- Contact No : •Prin.Kadam : 9011768522 •Prof.Wadvalkar: 7276790213 •Prof.Bhojane : 7385892347 •Prof.Gujar : 8796676719 •Prof.Poojary : 8308379867

Enroll Now


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com